




अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड


आयपीएल सामना क्र.६१

CHENNAI SUPER KINGS Vs Kolkata Knight Riders

चेन्नई विरुद्ध कोलकाता

वेळ : रात्री.७.३० वा. स्थळ : चेन्नई


www.surajyadigital.com | रविवार, दि. १४ मे २०२३ | ▶ वर्ष : २१ वे ▶ अंक : २२४ वा किंमत : ५ रुपये ▶ पाने ८


# कर्नाटकात काँग्रेसची मुसंडी; भाजपला दणका

## मरगळलेल्या काँग्रेसमध्ये नवचैतन्य

## आता लक्ष्य २०२४

✔ सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**दक्षिण भारतातील महत्त्वाचे राज्य असलेल्या कर्नाटकमध्ये काँग्रेसने भाजपा धक्का देत जोरदार मुसंडी मारत बहुमतापेक्षा अधिक जागा जिंकून आणखी एकदा इतिहास घडविल्याचे आज मतमोजणीनंतर स्पष्ट झाले आहे. २२४ जागांपैकी तब्बल १३६ जिंकत काँग्रेसने आपला बहुमताचा पाया रचून एकहाती सत्ताकेंद्र निर्माण केले आहे. भाजपाला ६५, जेडीएसला १९ तर अपक्षांचा ४ जागांवर समाधान मानावे लागले आहे. या दमदार विजयाने मरगळलेल्या काँग्रेसमध्ये नवचैतन्याचे वारे पसरले आहे. काँग्रेसप्रमाणेच भाजपाविरोधकांमध्ये अक्षरश:: आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. आता 'लक्ष्य २०२४ च्या लोकसभेचे' असा भाजपाविरोधकांना यानिमित्ताने केला आहे.**



कर्नाटक विधानसभेच्या निवडणुकीकडे संबंध देशाचे लक्ष्य लागून राहिले आहे. आजच्या मतमोजणीकडे सर्वच राजकीय पक्षाचे लक्ष होते. अखेर दुपारनंतर या निवडणुकीचे निकाल स्पष्ट झाले. ही निवडणूक लोकसभेची 'लिटमस टेस्ट' मानली गेली होती. त्यामुळे भाजपाचे आणि काँग्रेसने आपली ताकद पूर्ण पणाला लावली होती.

मतदारांना आकर्षित करण्यासाठी अनेक आश्वासने दिली गेली तर काहींनी भावनिक मुद्देही प्रचारात आणली होती. हिमाचल प्रदेश प्रमाणे भाजपला सलग दुसऱ्यांदा सत्ता मिळवता आली नाही. बसवराज बोम्मई यांना दुसऱ्यांदा मुख्यमंत्रिपदी बसवण्यात नरेंद्र मोदींना ही शक्य झाले नाही. या निवडणुकीत मोदींनी एकट्याने दिशा बदलण्याचा प्रयत्न केला पण काँग्रेसच्या रणनीतीसमोर ते अपयशी ठरले. कर्नाटकमध्ये एग्झिट पोलने वर्तवलेल्या अंदाजानुसार निकाल आले आहेत. बजरंगबलीच्या जोरावर सत्ता पुन्हा मिळवण्याच्या भाजपच्या मनसुब्यांना धक्का बसला. कर्नाटक विधानसभेच्या निकालावरून एक गोष्ट स्पष्ट झाली की, ऐन महत्त्वाच्या वेळी महत्त्वाच्या मुद्द्यांवरून अन्य मुद्दे हाती घेतले तर त्यांचा अधिक काळासाठी फायदा होत नाही. ही गोष्ट कर्नाटकच्या निकालावरून क्लिअर झाली आहे. हिमाचल प्रदेश प्रमाणे भाजपला सलग दुसऱ्यांदा सत्ता मिळवता आली नाही. बसवराज बोम्मई यांना दुसऱ्यांदा मुख्यमंत्रिपदी बसवण्यात नरेंद्र मोदींना ही शक्य झाले नाही. या निवडणुकीत मोदींनी एकट्याने दिशा बदलण्याचा प्रयत्न केला पण काँग्रेसच्या रणनीतीसमोर ते अपयशी ठरले.

काँग्रेसने निवडणुकीतील रणनीती योग्य ठेवली. सुरुवातीपासून शेतकऱ्यांचे प्रश्न उपस्थित केले. बसवराज बोम्मई यांच्या सरकारच्या त्रुटींवर फोकस केले. भारतीय जनता पक्षाला दोन मुख्यमंत्री बदलावे लागले, यामागील भ्रष्टाचाराचा मुद्दा काँग्रेसने लावून धरला. येडियुरप्पा यांच्यावर लागलेले भ्रष्टाचाराचे डाग भाजपला पुसता आले नाहीत आणि काँग्रेसने हाच मुद्दा उचलून धरला. दुसऱ्या बाजूला खर्गे यांनी शिवकुमार, प्रियंका आणि राहुल गांधी यांनी ५ अशी आश्वासने दिली ज्याचा थेट प्रभाव कर्नाटक विधानसभेच्या निकालावर दिसून येत आहे.

### अशी होती उमेदवारांची संख्या

कर्नाटक विधानसभेसाठी २२४ जागांसाठी एकूण २६१५ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. यामध्ये ९०१ अपक्ष आहेत. भाजपाने सर्व २२४ उमेदवार केले होते. तर काँग्रेसने २२१, जेडीएसने २०८, आम आदमी पार्टीने २०८श बसपाचे १२७, समाजवादी पक्षाने १४, राष्ट्रवादी काँग्रेसने तर इतर राजकीय पक्षाचे ६६९ उमेदवार रिंगणात होते. यातील भाजपा, काँग्रेस, जेडीएस आणि इतर ४ अ अपक्षांशिवाय कुणालाही आपले खाते उघडता आले नाही.

### निकालावर दृष्टीक्षेप...

| पक्ष | २०२३ | २०१८ | फरक |
|---|---|---|---|
| काँग्रेस | १३६ | ८० | +५६ |
| भाजपा | ६५ | १०४ | -३९ |
| जेडीएस | १९ | ३७ | -१८ |
| इतर | ०४ | ०३ | +१ |

### लक्षवेधक...

▶ काँग्रेसवासी झालेले भाजपचे माजी मुख्यमंत्री जगदीश शेट्टर यांचा हुबळी-धारवाड मतदारसंघात भाजपाचे मंगेश तेंगिनाकायी यांनी ३ ४ हजार २८९ मतांनी पराभव केला. ▶ कर्नाटकच्या निवडणुकीत आजवर सर्वाधिक जागा जिंकण्याचा मान काँग्रेसनेच मिळविला. १९५७ ला १५०, १९७२ ला १६५, १९७८ ला १४९, १९८९ ला १७८ आणि आता २०२३ ला १३६ म्हणजे बहुमतापेक्षाही जास्त जागा काँग्रेसने मिळविल्या आहेत. ▶ काँग्रेसच्या विजयामगे लिंगायत समाजाचे एम. बी. पाटील, माजी सनदी अधिकारी शशिकांत सेंथील, माजी उपमुख्यमंत्री पी परमेश्वर आणि डेटा अनालिसेस तज सुनील कानगोल हे चार चाणक्य असल्याचे बोलले जात आहे. ▶ महाराष्ट्र एकीकरण समितीचे पाच उमेदवार कर्नाटकच्या निवडूक रिंगणात होते. पण यापैकी एकालाही आपला विजय मिळविता आला नाही. ▶ निष्ठावंत नेत्यांना डावलल्याचा भाजपला फटका?

## महसूल भवनाचे उद्‌घाटन पुन्हा रखडले

**उपमुख्यमंत्र्यांचा दौरा रद्द; पुढील आठवड्यात तारीख देणार**

✔ सुराज्य/सोलापूर





शासकीय दूध डेअरीच्या जागेतील बहुचर्चित महसूल भवन अर्थात जिल्हाधिकारी कार्यालयाच्या उद्‌घाटनाला मुहूर्त मिळाला होता मंगळवारी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्‌घाटन होणार होते. प्रशासनाकडून सर्व लगबग चालू असताना कर्नाटक राज्यात झालेल्या सत्ताबदलामुळे उपमुख्यमंत्री फडणवीस यांचा सोलापूर दौरा रद्द झाला आहे. पुढील आठवड्यात उद्‌घाटनाची तारीख दिली जाईल असा मेल जिल्हाप्रशासनास आला आहे. त्यामुळे मंगळवारचा महसूल भवनाचा उद्‌घाटन सोहळा रद्द झाला आहे. मात्र पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचा सोमवारचा दौरा फिक्स असल्याचे जिल्हा प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले.

उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या दौऱ्यांच्या निमित्ताने प्रभारी जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे यांनी बैठक घेतली होती. या बैठकीला निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, नगर अभियंता लक्ष्मण चलवादी यांच्यासह इतर विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. जिल्हा प्रशासनाकडून सर्व तयारी झाली होती.

मात्र शनिवारी कर्नाटक राज्यातील निवडणुकीचे निकाल हाती आले आणि भाजपाचा पराभव झाला आहे. यासंदर्भात चिंतन करण्यासाठी राज्यातील भाजपचे नेते मंडळी एकत्र येणार असल्याने उपमुख्यमंत्री फडणवीस यांचा मंगळवारचा सोलापूर दौरा रद्द झाला आहे. तसे पत्र जिल्हाप्रशासनास प्राप्त झाले आहे. पुढील आठवड्यातील तारीख उद्‌घाटनाची कळवली जाईल असे उपमुख्यमंत्री कार्यालयातून प्राप्त झालेल्या पत्रामध्ये म्हटले आहे.

## भारतमाता नगरात महिलेची गळफास घेऊन आत्महत्या

✔ **सोलापूर** : होटगी रोडवरील विमानतळा जवळ असलेल्या भारतमाता नगरात एका महिलेने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना शनिवारी दुपारच्या सुमारास घडली. अंजली प्रताप पवार (वय २४रा.भारत माता नगर) असे आत्महत्या केलेल्या महिलेचे नाव आहे.

दुपारी चार वाजेच्या सुमारास तिने घरगुती कारणातून घराच्या वरच्या मजल्यावरील छताच्या लोखंडी हुकला साडीने गळफास घेतली होती. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर तिला फासातून सोडवून बेशुद्ध अवस्थेत सतीश पवार आणि प्रताप पवार यांनी शासकीय रुग्णालय दाखल केले होते. मात्र ती उपचारापूर्वी मरण पावली. या घटनेची प्राथमिक नोंद सिव्हील पोलिसात झाली आहे.

## विवाहित तरुणाची रेल्वेखाली आत्महत्या

✔ सुराज्य/सोलापूर



एका खासगी फायनान्स कंपनीत काम करणाऱ्या विवाहित तरुणाने रेल्वे खाली झोकून देऊन आत्महत्या केली. ही घटना छत्रपती संभाजी तलाव परिसरातील रेल्वे पुलाखाली आज शनिवारी दुपारी उघडकीस आली.

विरेश श्रीपाद जीर (वय २८ रा.न्यू सुनील नगर, एमआयडीसी, सोलापूर) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. शनिवारी दुपारी त्याने तलावा शेजारील दर्ग्याच्याजवळ एका झाडाखाली आपली दुचाकी उभी केली. त्यानंतर त्याने पुलाजवळ रेल्वे खाली आत्महत्या केली. याची माहिती मिळाल्यानंतर लोहमार्ग पोलिसांनी घटनास्थळी येऊन पाहणी केली. त्यावेळी रेल्वे अंगावरून गेल्याने त्याच्या शरीराचे दोन भाग झाल्याचे आढळून आले.

मृतदेहाशेजारी बॅग आणि त्याच्या खिशात मिळालेल्या कागदपत्रावरून त्याची ओळख पटली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शासकीय रुग्णालयाकडे उत्तरीय तपासणीसाठी पाठवून दिला. मयत विरेश जीर हा विवाहित असून त्याच्या पश्चात आई, भाऊ, पत्नी आणि ३ महिन्याची मुलगी असा परिवार आहे. तो एका खाजगी फायनान्स कंपनी कामाला होता. कर्जास कंटाळून त्याने आत्महत्या केली असावी अशी चर्चा आहे. या घटनेची नोंद लोहमार्ग पोलिसात झाली असून या मागचे निश्चित कारण अद्याप समजले नाही.

## जागेच्या वादातून पुतण्यावर कोयता आणि चाकूने हल्ला

✔ सुराज्य/सोलापूर

भाऊकीतील जागेच्या वादातून कोयता,चाकू आणि काठीने केलेल्या मारहाणीत पुतण्या आणि दोन महिला गंभीर जखमी झाल्या. ही घटना शेलगाव वांगी (ता.करमाळा) येथे घडली. या प्रकरणात पोलिसांनी चुलत्यासह पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

लंकेश धर्मेंद्र भोसले,त्याची आई सुनीता, आणि बहीण अमृता भोसले अशी जखमींची नावे आहेत. याप्रकरणी जखमी लंकेश भोसले (वय१९) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून त्याचा चुलता विनोद भोसले, राज भोसले, ऋतिक भोसले, अंजीर भोसले आणि संगीता भोसले (सर्व रा.शेलगाव वांगी) अशा पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. लंकेश भोसले हा त्याच्या आई आणि बहिणी सोबत गुरुवारी रात्री घरात बोलत बसले होता. त्यावेळी त्याचा चुलता विनोद हा घराजवळ येऊन तुम्हाला जागेमध्ये हिस्सा कशाला पाहिजे? असे म्हणत शस्त्राने हल्ला केला.

## वेळापुरात पैशावरुन कोयत्याने हल्ला

✔ सुराज्य/सोलापूर

पैशाचे व्याज दिले नाही या कारणावरून तरुणास कोयता आणि पाईपने मारहाण केली . ही घटना वेळापूर (ता. माळशिरस) येथील माऊली चौकात गुरुवारी सायंकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणात वेळापूरच्या पोलिसांनी खाजगी सावकारासह तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

कुंडलिक शिंदे (वय २६ रा. दसुर ता.माळशिरस) असे जखमींचे नाव आहे . त्याला गंभीर अवस्थेत अकलूजच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. दिलेल्या फिर्यादीवरून अवधूत शेंडगे, दादा भडंगे (दोघे रा.वेळापूर) आणि हरिदास जाधव (रा.खंडाळी) या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला . जखमी कुंडलिकने अवधूतकडून २० टक्के व्याज दराने १० हजार रुपये घेतले होते. त्याचे व्याज दिले नाही म्हणून तिघांनी सायंकाळच्या सुमारास त्याला वेळापूर येथील माऊली चौकात मारहाण करून गंभीर जखमी केले. सहाय्यक निरीक्षक वागाव पुढील तपास करीत आहेत.

## सलगर बु।। येथे इसमाची आत्महत्या

✔ **मंगळवेढा** : सलगर बु।। येथे एका ४५ वर्षीय इसमाने अज्ञात कारणावरून घरातील पंख्याला नायलॉनच्या दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली. संभाजी रामण्णा टिक्के असे त्या मयताचे नाव आहे. दरम्यान या घटनेची पोलिसात आकस्मात मयत अशी नोंद झाली आहे. टिक्के यांनी शनिवारी नायलॉनच्या दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केली.

## सूर्याचा रूद्रावतार, सोलापूरकरांची होरपळ

✔ सुराज्य/सोलापूर




सोलापुरात शनिवारी सूर्याचा रुद्रावतार पहायला मिळाला. कमाल तापमान ४३.३ अंश सेल्सिअसपर्यंत गेले होते. यंदाच्या उन्हाळ्यातील हा पारा उच्चांकी आहे.

सूर्य तळपल्याने दिवसभर सोलापूरकरांची होरपळ झाली. शहराचे तापमान गेल्या तीन दिवसांपासून सतत वाढत आहे. शुक्रवारी कमाल तापमान ४१.४ इतके होते.त्या अगोदरही पारा ४२च्या उंबरठ्यावर होता. अवकाळी पावसामुळे गारवा अनुभवलेल्या सोलापूरकरांना गेल्या तीन दिवसात उन्हाचे चटके सहन करावे लागले.आज ना उद्या पारा उतरेल,असे सोलापूरकरांना वाटत होते परंतु वैशाख वणव्याने शनिवारी शहरवासीयांना चांगलाच दणका दिला. शनिवारी सकाळी आठ वाजल्यापासून अंगातून घामाच्या धारा वाहत होत्या. त्यावेळी तापमान वाढण्याची कुणकुण लागली होती. दहानंतर सूर्य तळपत राहिला.सायंकाळी सहा वाजेपर्यंत त्याचे तळपणे सुरूच होते.प्रखर उन्हामुळे लोकांनी बाहेर पडणेच थांबवल्याने सोलापूरच्या व्यवहारावर परिणाम झाला आहे.शहरातील रस्त्यांवरची वर्दळ एकदम कमी झाली आहे.अजूनही काही दिवस उष्मा वाढत राहील,असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




तुला 'डे' हवा होता ना...
मग आता नाईट का मागतोय?

**कल्याण**

**456-51-137**

## धानोरे परिसरात मादी बिबट्याचा आणि बछड्याचा वावर

### शेतकऱ्याच्या वासरावर हल्ला करून केले फस्त

✔ सुराज्य/वेळापूर



वेळापूर जवळील धानोरे येथील परिसरामध्ये काल शुक्रवारी रोजी रात्रीच्या सुमारास धानोरे तोंडले रोडवरील चव्हाण नावाच्या शेतकऱ्याच्या दारात बांधलेल्या लहान वासरावर हल्ला करून ओढून नेऊन ते बिबट्या सदृश प्राण्याने फस्त केले आहे.

याबाबत पिलीव वन परिमंडल अधिकारी सोमनाथ क्षीरसागर यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले की गेली दोन महिन्यापासून मादी बिबट्या व त्याचे बछडे यांचा फळवणी, साळमुख, कोळेगाव, मगराचे निमगाव, महिम आणि आत्ता धानोरे या परिसरात बिबट्या मादीचा व त्याच्या बछड्याचा वावर आहे. हे आम्ही नाकारत नाही. बिबट्या हिंसक बनलेला नसून रानावनात जे काही प्राणी खाण्यास मिळेल त्यावर राहून तो सतत जागा बदलत असतो. आता त्या बिबट्या सदृश प्राण्याचे धानोरे परिसरात वास्तव्य दिसून आले आहे. त्याने एक वासरू फस्त केले आहे. या प्राण्याबाबत वनविभागाला कल्पना देताच लागलीच त्यांचे वनपरिक्षेत्र अधिकारी दयानंद कोकरे, वन परिमंडल अधिकारी नातेपुते एस.एम. लडकत, वनमजूर बापू चव्हाण , गणेश मगर, वैभव बोडरे यांनी धानोरे येथील उसाच्या रानात ठशांची पहाणी केली. तेथे मोठ्या प्राण्याचे ठसे व लहान प्राण्याचे ठसे आढळून आले. तसेच वन विभाग पथकाने परिसराची पहाणी केली असता त्यांना वासरू खाऊन टाकल्याचे केस, हाडे, रक्ताचे ठसे आढळून आले. यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी दयानंद कोकरे यांनी धानोरे ग्रामस्थांनी, शेतकऱ्यांनी घाबरून जाऊ नये अथवा अफवा पसरवू नयेत, शेतकऱ्यांनी आपली काळजी घ्यावी असे आवाहन केले आहे. शेतकऱ्यांनी काळजी घेणे गरजेचे आहे. रात्रीच्या वेळेस आपली जनावरे बंदिस्त शेडमध्ये बांधावीत, शेतीच्या कामासाठी रानात जाताना एकटे जाऊ नये, असे आवाहन केले आहे. धानोरे ग्रामपंचायतीने पिंजरा बसवण्याची मागणी केल्यास जिथे पिंजरा बसवण्याचे गरज आहे त्या ठिकाणी बसवला जाईल, असे सांगण्यात आले.

### नियमाप्रमाणे नुकसान भरपाई मिळेल : क्षिरसागर

धानोरे येथील ज्या शेतकऱ्यांच्या वासरावर हल्ला केला आहे, त्या शेतकऱ्यास शासनाच्या नियमाप्रमाणे नुकसान भरपाई दिली जाईल असे वन परिमंडल अधिकारी सोमनाथ क्षीरसागर व वन परिमंडल अधिकारी नातेपुते एस एम लडकत यांनी सांगितले.

## जनतेची सेवा करावी, शुभेच्छा : पंतप्रधान नरेंद्र मोदी



कर्नाटक निवडणुकीत ज्यांनी पाठिंबा दिला त्या सर्वांना धन्यवाद. भाजपा कार्यकर्त्यांनी निवडणुकीत केलेल्या कष्टाचं मी कौतुक करतो. आम्ही आगामी काळात कर्नाटकच्या जनतेची अधिक जोमाने सेवा करू. कर्नाटक विधानसभा निवडणुकीतील विजयासाठी काँग्रेस पक्षाचं अभिनंदन. जनतेच्या आशाआकांक्षा पूर्ण करण्यासाठी मी त्यांना सदिच्छा देतो.

*कर्नाटकात काँग्रेसचे पूर्ण बहुमताचे सरकार स्थापण होणार आहे. देशात बऱ्याच काळानंतर मिळालेल्या या दणकेबाज विजयानंतर काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यासह काँग्रेसमध्ये चैतन्य निर्माण झाले आहे. काँग्रेस १३६ जागा मिळवत स्पष्ट बहुमत मिळले आहे.भाजपला ६४ जागांवर समाधान मानव लागले आहे. कर्नाटक जिंकण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांनी प्रयत्नांची पराकाष्टा केली. मात्र भाजपला विजय मिळवून देण्यात मोदींचा करिष्मा देखील कमी पडला. काँग्रेसचे नेते राहुल गांधी त्यांच्या भारत जोडो यात्रेमुळे विजयाचे शिल्पकार ठरले आहे. या निकालावर सोलापुरातील भाजप- शिंदे गटातील नेते या निकाला महाराष्ट्रात परिणाम नाही असे म्हणत आहेत तर दुसरीकडे महाविकास आघाडीचे नेते म्हणात महाराष्ट्रातही बदल नक्की घडणार असे सांगत आहेत.*

## कर्नाटकात द्वेषाचा बाजार बंद झालाय राहुल गांधीं



मला सगळ्यात जास्त ही गोष्ट आवडली की आम्ही द्वेषाने, चुकिच्या शब्दांनी ही लढाई नाही लढली. आम्ही प्रेमाने ही लढाई लढलो. कर्नाटकच्या जनतेनं आम्हाला हे दाखवलं की प्रेम या देशाला हवंसं वाटतंय. कर्नाटकात द्वेषाचा बाजार बंद झालाय आणि प्रेमाची दुकानं उघडली गेली आहेत. हा कर्नाटकच्या जनतेचा विजय आहे.

# भाजप-शिंदे गट म्हणतो, राज्यात परिणाम नाही

## महाविकास आघाडीचे नेते म्हणतात, महाराष्ट्रातही बदल नक्की

### महाराष्ट्रातील निवडणुकांवरकाही फरक

कर्नाटक मध्ये गेली दहा वर्षे झालं भाजपची सत्ता आहे. कर्नाटक विधानसभा निवडणुकीमध्ये कुठल्याही कोणत्याही पक्षाला सलग सत्ता देत नाही प्रत्येक वर्षी पाच वर्षानंतर सत्ता बदल होतो. त्याचाच प्रकार यंदाच्या निवडणूकमध्ये घडला आहे. भाजपची सत्ता जाऊन काँग्रेसची सत्ता आली आहे. याचे पडसाद राज्यातल्या निवडणुकांवर होणार नाही.

- **अमोल शिंदे** (जिल्हाप्रमुख शिवसेना शिंदे गट)

### महाराष्ट्रात परिवर्तन अटळ

कर्नाटक सरकारमध्ये भाजपची सत्ता जाऊन परिवर्तनाची लाट सुरू झाली आहे. मोदी आणि अमित शहा यांची धेयधोरण चुकली आहेत. महागाई आणि गॅस दरवाढ, बेरोजगारी यामुळे जनता वैतागली आहे. त्यामुळे कर्नाटकमध्ये भाजप सरकारला पायउतार व्हावे लागले. हे जनतेने करून दाखवलं भविष्यकाळात देखील देशभरामध्ये ज्या ठिकाणी भाजपची सत्ता आहे.

- **भारत जाधव** ( शहराध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस)

### मोदी शहा सरकारची लाट ओसरत चालली

कर्नाटक राज्याच्या विधानसभेच्या निकालावरून भारतीय जनता पार्टीला स्पष्टपणे नाकारल्याचे दिसून आले आहे. काँग्रेसला बहुसंख्येने सत्ता दिल्याचे कर्नाटकच्या जनतेने दिले भारतीय जनता पार्टीने केलेल्या केंद्रीय तपास यंत्रणाचा गैरवापर, महागाई, बेरोजगारी, अंतर्गत नाराजी आदीमुळे भाजपचा दारुण पराभव झाला.

- **प्रा. काकासाहेब कुलकर्णी** (काँग्रेस प्रदेश प्रवक्ते)

### मोदी शहा यांचा हा पराभव

कर्नाटक मध्ये भाजपचा झालेला पराभव हा भाजपाचा तर आहेच त्याशिवाय पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांचा खरा पराभव आहे. कोणतीही निवडणूक असो मोदी आणि अमित शहा यांच्या नावाने मते मागण्याचा प्रकार भाजपाने आतापर्यंत केला. त्याला प्रतिसाद कर्नाटकातील जनतेने दिला नाही. भाजप तोंडघशी पडली आहे.

- **पुरुषोत्तम बरडे** ( जिल्हाप्रमुख शिवसेना ठाकरे गट)

### लवकरच भाजप मुक्त देश

संपूर्ण देशभरात भारतीय जनता पार्टीची लाट ओसरत असल्याचे चित्र सध्या देशभरामध्ये निर्माण झाले आहे. कर्नाटकच्या निकालावरून स्पष्ट होतं आता लोकांनीच ठरवलेलं आहे. भाजपला हद्दपार करून भाजप मुक्त देश करण्याचा भाजपाचा विकास कामाची काही देणंघेणं नाही जाती-जातीमध्ये ते निर्माण करून राज्य ताब्यात घ्यायची ही भाजपाची पॉलिसी ला जनता वैतागली आहे.

- **शेखर माने** ( राष्ट्रवादी निरीक्षक)

### हा राहुल गांधीचा करिश्मा

कर्नाटक राज्याने देशाला चांगला निकाल दिला आहे. मोदी आणि शहा यांनी धर्म आणि देवदेवतांच्या नावाने मते मागणे जनतेला रूचल नाही विकासाचा कोणत्याही अजेंडा नाही. काँग्रेसची सत्ता असताना कटकारस्थान करून सरकार स्थापन केलेले कर्नाटक जनतेला रूचल नाही त्यामुळे काँग्रेसला एक हाती सत्ता दिली आहे. हा करिश्मा राहुल गांधी यांच्यासह कर्नाटकातील स्थानिक नेते मंडळीचा आहे.

- **चेतन नरोटे** ( शहराध्यक्ष काँग्रेस)

कर्नाटक सरकारने देशात जातीवाद नाही तर धर्मवाद चालतो हे कर्नाटक सरकारने देशाला दाखवून दिले आहे. महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार हे मुद्दे घेऊन काँग्रेसने प्रचार केला. उलट भाजपने जाती धर्माचा आणि देव देवतांचा आधार घेत मते मागितली हे कर्नाटक जनतेला पटल नाही या देशात सर्वजातीधर्माचा देश असल्याचे कर्नाटक जनतेने दाखवले आहे. राहुल गांधीच्या भारत जोडो यात्रा असो अथवा कर्नाटक राज्यातील नेते मंडळींनी योग्य नियोजन करून हा विजय मिळवला आहे.कर्नाटक जनतेचे आभार

- **प्रणिती शिंदे** ( आमदार शहरमध्य विधानसभा )

## कर्नाटक निकाल; साद-पडसाद

### लिंगायत समाज काँग्रेसच्या मागे

लिंगायत समाजाला डावलणे हे भाजपला महागात पडले आगे. उलट काँग्रेसने लिंगायत समाजला प्रतिनिधी देऊन प्रवाहत आणले त्यामुळे समाज काँग्रेसल मागे उभा राहिला काँग्रेसचा दणदणीत विजय झाला. मोदी शहा यांनी धर्माच्या नावे मते मागितली हे जनतेला पटल नाही

- **विश्वनाथ चाकोते** ( माजी आमदार काँग्रेस)

### दडपशाही आणि हुकूमशाहीला जनता वैतागली होती

भाजपाच्या दडपशाहीला आणि हुकुमशाहीला कर्नाटकातील जनता वैतागली होती. देशापुढे आणि कर्नाटक राज्यापुढे भाजपाचा कोणतीही विकासाचा अजेंडा नव्हता. फक्त भ्रष्टाचार, दडपशाही आणि हुकूमशाही या पद्धतीने आतापर्यंतची भाजपाची वाटचाल आहे. या सर्व गोष्टीला जनता वैतागली होती.

- **अमर पाटील** (शिवसेना जिल्हाप्रमुख ठाकरे गट)

### मोदी है तो मुमनिक है, जनतेने नाकारले : शरद पवार

दरम्यान, शरद पवारांनी कर्नाटकमध्येही फोडाफोडीच्या राजकारणाची शक्यता व्यक्त केली आहे. फोडाफोडीच्या राजकारणाची शक्यता नाकारता येत नाही. पण कर्नाटकच्या जनतेनंच असा निकाल दिलाय. फोडाफोडीला संधी मिळणार नाही याची खबरदारी जनतेनंच घेतली आहे, असं शरद पवार म्हणाले आहेत. कर्नाटक निवडणूक निकालांनंतर घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये ते बोलत होते. मोदी है तो मुमकिन है' याला लोकांनी नाकारल्याचं शरद पवार म्हणाले.

### एकाधिकारशाही व हुकुमशाहीचा पराभव : उध्दव ठाकरे

कर्नाटक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी पहिली प्रतिक्रिया दिली आहे. कर्नाटक निवडणुकीच्या माध्यमातून देशातील एकाधिकारशाही आणि हुकूमशाहीच्या पराभवाला सुरुवात झाली आहे, अशी प्रतिक्रिया उद्धव ठाकरेंनी दिली. यावेळी उद्धव ठाकरेंनी कर्नाटकच्या जनतेचे विशेष आभार मानले. सामान्य माणूसच हुकूमशहाचा पराभव करू शकतो, हा विश्वास कर्नाटकच्या जनतेने देशाला दिला आहे.

### भाजपाचे कृत्रिम टंचाई वाढवली : नाना पटोले


कर्नाटकात महागाई मोठ्या प्रमाणात वाढली. केंद्रातील भाजपा सरकारने ९ वर्षात कृत्रिम महागाई वाढवली. देशातील संपत्ती विकल्या जात आहेत. याचेच उत्तर कर्नाटकाने भाजपाला दिले', अशा शब्दांत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी भाजपावर निशाणा साधला. केंद्रातील पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या सरकारने लोकशाहीचा खून करण्याचा प्रयत्न केला.

## भाजपाचे ऑपरेशन 'लोटस' फेल : काँग्रेस नेते सिद्धरामय्या



कर्नाटक विधानसभा निवडणुकीत आम्ही १३६ जागांचा आकडा पार करू, हा काँग्रेसचा मोठा विजय आहे. कर्नाटकातील लोकांना बदल हवा होता, कारण ते भाजप सरकारला कंटाळले होते. भाजपाने ऑपरेशन 'लोटस'वर भरपूर पैसा खर्च केला. पण राहुल गांधींच्या पदयात्रेची पक्षाला प्रचंड मदत झाली, असे काँग्रेस नेते सिद्धरामय्या म्हणाले.

## आम्ही धडा घेऊ : माजी मुख्यमंत्री बोम्मई



पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपा कार्यकर्त्यांनी भरपूर प्रयत्न करूनही आम्हाला बहुमताचा आकडा गाठता आलेला नाही. एकदा पूर्ण निकाल जाहीर झाला की आम्ही त्याचं सविस्तर विश्लेषण करू. आम्ही या निकालावरून धडा घेत लोकसभा निवडणुकीत पुनरागमन करू, माजी मुख्यमंत्री बोम्मई म्हणाले?

## ... ती पाच आश्वासने पहिल्या कॅबिनेटमध्येच पूर्ण करु : राहुल गांधी

**नवी दिल्ली :** कर्नाटक विधानसभेच्या निमित्ताने काँग्रेसने मतदारांना पाच आाश्वासने दिली होती. ज्यांचे स्वागत कर्नाटकातील जनतेने केले. आता ही आश्वासने पहिल्याच कॅबिनेटमध्ये पूर्ण करू, असे राहुल गांधी यांनी म्हटले आहे.

कर्नाटक विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने १३६ जागांवर आघाडी घेतल्यानंतर देशभरातील काँग्रेसजनांमध्ये उत्साहाचे वातावरण पसरले आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेसचे माजी अध्यक्ष आणि नेते राहुल गांधी यांनीदेखील आपली प्रतिक्रिया नोंदविली आहे. काँग्रेसने आपल्या जाहीरनाम्यात जी पाच आश्वासने दिली होती, ती पहिल्या कॅबिनेटमध्ये पूर्ण करू, असे विधान त्यांनी केले आहे. काँग्रेसने जाहीरनाम्यात दिलेल्या



आश्वासनांना फाइव्ह गॅरंटी म्हटले होते.

काँग्रेसने दिलेली हीच 'ती' पाच आश्वासने

१. गृह ज्योती' अंतर्गत प्रत्येक घरासाठी २०० युनिटची वीज मोफत देण्यात येईल.

२. गृह लक्ष्मी' योजनेंतर्गत कुटुंबप्रमुख असलेल्या महिलेला प्रति महिना दोन हजार रुपये देण्यात येतील.

३. युवा निधी' योजनेच्या माध्यमातून पदवीधर आणि पदविका घेतलेल्या बेरोजगार तरुणांना भत्ता देण्यात येईल.

४. उचित प्रयत्न' योजनेच्या माध्यमातून सर्व महिलांना राज्य परिवहन विभागाच्या बसमधून मोफत प्रवासाची सुविधा देण्यात येईल.

५. अन्न भाग्य' योजनेच्या माध्यमातून दारिद्र्य रेषेच्या खाली असलेल्या कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीला १० किलो धान्य मोफत देण्यात येईल.

## दक्षिणेत भाजपची नाकाबंदी



**मुंबई :** कर्नाटकात भाजपचा धुव्वा उडवत काँग्रेसने स्पष्ट बहुमताने राज्याची सत्ता काबीज केली आहे. कर्नाटक विधानसभेच्या २२४ जागांपैकी १३६ जागांवर काँग्रेसने विजयी पताका फडकावली. या विजयाने काँग्रेस कार्यकर्त्यांसह बिगरभाजप पक्षांच्या नेते आणि कार्यकर्त्यांमध्येही उत्साह निर्माण झाला आहे. महाराष्ट्रात महाविकास आघाडीतील नेत्यांकडूनही या विजयानंतर काँग्रेसचं अभिनंदन करत भाजपवर निशाणा साधला जात आहे. राष्ट्रवादीचे नेते आणि विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनीही ट्वीट करत काँग्रेस कार्यकर्त्यांचं अभिनंदन केलं आणि आगामी काळात महाराष्ट्रातही महाविकास आघाडीची सत्ता येईल, असा विश्वास व्यक्त केला आहे.

'कर्नाटक विधानसभा निवडणुकीत मतदारांनी काँग्रेसला दिलेला कौल हा कर्नाटक आणि देशाच्या राजकारणाची वाटचाल पुन्हा एकदा विकास आणि लोकशाही मजबूत करण्याच्या दिशेनं सुरू झाल्याची नांदी आहे. कर्नाटकातील काँग्रेसच्या विजयानं भाजपची दक्षिणेकडील पुरती नाकाबंदी केली आहे,' असा हल्लाबोल अजित पवारांनी केला. तसंच राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस, शिवसेना, मित्रपक्षांची महाविकास आघाडी महाराष्ट्रातही याची पुनरावृत्ती करेल. महाराष्ट्रातील जनतेनं तसा निर्धार आधीच केला आहे. कर्नाटकातील मतदार, काँग्रेस नेते व कार्यकर्त्यांचं मन:पूर्वक अभिनंदन, असंही अजित पवार म्हणाले.

# विजयपूर जिल्ह्यात सहा जागांवर काँग्रेसचा दणदणीत विजय

## भाजपा व जेडीएसला प्रत्येकी एक जागा

**विजयपूर - दीपक शिंत्रे**

विजयपूर जिल्ह्यात प्रचंड उत्सुकता निर्माण करणाऱ्या सार्वत्रिक विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर झाला असून विजयपूर जिल्ह्यातील ८ मतदारसंघात चुरशीची लढती झाल्या. यापूर्वी चार जागा जिंकणाऱ्या भाजपला केवळ एका जागेवर समाधान मानावे लागले आहे. तीन जागा जिंकणाऱ्या काँग्रेसने आता सहा जागा जिंकून मुसंडी मारलेली आहे. दोन जागा जिंकणाऱ्या निधर्मी जनता दलास एका जागेवर समाधान मानावे लागले. जिल्ह्यातील आठ मतदारसंघांपैकी भाजपने विजयपूर शहर मतदारसंघ जिंकला असून हिंदू फायरब्रँड बसनगौडा पाटील यत्नाळ (भाजप) यांना ९४२०१ मते मिळाली असून, ८२२३ च्या फरकाने विजयी झाले. त्यांचे विरोधक काँग्रेसचे अब्दुल हमीद मुश्रीफ यांना ८५९%८ मते मिळाली आहेत आणि त्यांना पराभवाचा सामना करावा लागला.

-------------------------------

गेल्या वेळी निधर्मी जनता दलाच्या ताब्यात असलेल्या नागठाण राखींव मतदारसंघात काँग्रेसने ३०,८१५ च्या फरकाने विजय मिळवला आहे. काँग्रेसचे उमेदवार विठ्ठल कटकदोंड यांना %८९९० तर भाजपच्या संजीव अहोळे यांना ४८१७५ मते मिळाली. विद्यमान आमदार आणि जेडीएसचे देवानंद चव्हाण यांना ३४११४ मते मिळाली असून तिसऱ्या क्रमांकावर घसरण झाली आहे.

गतवेळी कमी मतांचा अंतराने विजयी झालेले शिवानंद पाटील या वेळी बसवनबागेवाडी मतदारसंघात शिवानंद पाटील हे २४ हजार ८६३ मतांचा अंतराने विजय मिळवला आहे. शिवानंद पाटील यांना ६८१२६ तर भाजपचे एस के बेळळोबी यांना ४३२६३ मते मिळाली. जेडीएसचे अप्पुगौडा पाटील यांना ४०१७७ तिसऱ्या क्रमांकावर आहेत. राज्यातील हायव्होल्टेज मतदारसंघ असलेला आणि काँग्रेस पक्षाच्या ताब्यात असलेला बबलेश्वर मतदारसंघ काँग्रेसने १५२१६ च्या फरकाने जिंकले आहे. काँग्रेस पक्षाचे राज्य प्रचार समितीचे अध्यक्ष डॉ. एम.बी. पाटील यांनी ९३,९२३ मते मिळवून आपली जागा राखली आहे. भाजपचे विजूगौडा पाटील पाटील यांना ७८७०७ मते मिळाली आहेत.

गेल्या वेळी भाजपच्या ताब्यात असलेल्या देवर हिप्परगी मतदारसंघात जेडीएसचे राजू गौडा पाटील ६५,९५२ मतांनी विजयी झाले. भाजप पक्षाचे विद्यमान आ. सोमणगौडा पाटील यांनी ४५,७७७ मतांनी पराभवाची चव चाखावी लागली आहे. काँग्रेसचे शरणप्पा सुणगार यांना ३३६७३ मते मिळवून तिसऱ्या क्रमांकावर आले आहेत. २०१७५ मतांचा अंतराने राजूगौडा पाटील हे विजयी झाले आहेत.

गेल्या पोटनिवडणुकीत भाजपच्या ताब्यात असलेल्या सिंदगी मतदारसंघात काँग्रेसचे उमेदवार अशोक मनगोळी ती जागा हिसकावून घेत विजयी मिळविला आहे, ७८०८ मतांच्या फरकाने विजयी झालेले काँग्रेसचे अशोक मनगोळी यांना ८७६२१ मते मिळाली असून भाजपचे उमेदवार रमेश भुसनूर यांना ७९८१३ मते मिळाली आहेत.

इंडी मतदारसंघातून गेल्या वेळेप्रमाणे या वेळीही काँग्रेसच्या यशवंतराय गौडा पाटील यांचा ७१७८५ मते घेत १०३२९ मतांच्या फरकाने विजय मिळवित हॅट्रिक केला आहे. निधर्मी जनता दलाचे बी.डी.पाटील यांना ६१४५६ मते मिळवून ही पुन्हा एकदा पराभूत व्हावे लागले. तर भाजपचे उमेदवार कासुगौडा पाटील यांना ३९८६२ मते मिळवून तिसऱ्या क्रमांकावर राहिले. मुद्देबिहाळ मतदारसंघातून भाजपचे विद्यमान आमदार ए.एस. पाटील नडहळळी व कॉग्रेसचे अप्पाजी नाडगौडा यांच्यात लढत होऊन.

गेल्या वेळी पराभूत झालेले अप्पाजी नाडगौडा यावेळी विजयी झाले त्यांना ७९४८३ मते मिळाली तर विद्यमान आमदार ऐ.एस पाटील नडहळळी यांना ७१८४६ मते मिळाली असून अप्पाजी नाडगौडा हे ७६३७ मतांचा अंतराने विजयी झाले आहेत.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R.N.I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail.com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# पाणीपुरवठ्याचे काम केले नाही; मक्तेदाराला टाकले काळ्या यादीत

## महापालिका प्रशासनाच्या उपसमितीने दिली मान्यता

सुराज्य/सोलापूर

पाणीपुरवठ्याचे काम न करणाऱ्या श्रीकांत आर सोनी मक्तेदाराला अखेर महापालिका प्रशासनाने काळ्या यादीत टाकले. महापालिका प्रशासनाच्या उपसमितीने या ठरावाला मान्यता दिली. अलीकडच्या काळात आणि प्रशासकीय राजवटीत अशा प्रकारची ही पहिलीच कारवाई ठरली आहे.

सोलापूर शहराचा पाणीपुरवठा सुधारण्याच्या दृष्टीने विविध भागातील पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन घालण्याची निविदा काढून नियमानुसार ते काम महापालिकेच्या गेल्या अनेक वर्षापासून कामे करत असलेल्या मक्तेदाराला देण्यात आले होते. परंतु ही कामे वेळ निघून जात असतानाही करत नसल्याने अखेर महापालिका प्रशासनाने मक्तेदार श्रीकांत आर सोनी यांना काळ्या यादीत टाकण्याचा निर्णय घेतला आहे.

मक्तेदार श्रीकांत सोनी यांना प्रस्तावात नमूद कामातील बयाणा रक्कम, सुरक्षित रक्कम जप्त करून काळ्या यादीत समाविष्ट करण्यास प्रशासकीय उपसमितीने मान्यता दिली आहे. अशा स्वरूपाच्या कारवाईचे पत्र महापालिकेचे जलवितरण सहाय्यक अभियंता यांनी मक्तेदाराला दिले आहे.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा सन २०२१-२२ मधील माजी महापौर आणि माजी सभागृह नेता यांच्या प्रभाग क्रमांक १८ अ मधील तक्षशील नगर पंचशील नगर ते कुमठा नाका परिसरातील पाणीपुरवठा सुधारण्यासाठी मेडिकल मुलींचे वस्तीगृह ते गुरुनानक चौकापर्यंत मुख्य पिण्याची पाण्याची पाईपलाईन घालण्याचे काम मक्तेदार श्रीकांत आर सोनी यांना देण्यात आले होते. मात्र हे काम त्यांच्याकडून करण्यात आले नाही. यामुळे त्या परिसरातील पिण्याच्या पाण्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला होता. यासंदर्भात पत्र आणि वारंवार सांगूनही काम न झाल्याने मक्तेदार सोनी यांच्या या कामातील बयाणा रक्कम सुरक्षित रक्कम जप्त करून त्यांना काळ्या यादीत समाविष्ट करण्याबाबत प्रस्तुत निर्णयांती हा प्रस्ताव उपसमितीकडे आणि महापालिका आयुक्त अध्यक्ष असलेल्या उपसमिती प्रशासकांकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आले होते. यावर महापालिका प्रशासक यांनी मान्यता देऊन त्या मक्तेदारावर कारवाई केली.



# पदोन्नती झालेल्या ५३ कर्मचाऱ्यांच्या अंतर्गत बदल्या

## एलबीटी विभागातील कर्मचारी कर आकारणी विभागाकडे

सुराज्य/सोलापूर

**महापालिकेतील पदोन्नती देण्यात आलेल्या ५३ कर्मचाऱ्यांच्या अंतर्गत बदल्या करण्यात आल्या आहेत. महापालिकेतील एलबीटी विभाग बंद करून सर्व कर्मचारी कर आकारणी विभागाकडे वर्ग करण्यात आले आहेत.**

महापालिका प्रशासनाने तयार केलेल्या आकृतीबंधानुसार अनेक कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली. याशिवाय रिक्त पदांवर त्यांची वर्णी लावताना प्रशासनाने ५३ वरिष्ठ आणि कनिष्ठ कर्मचाऱ्यांच्या अंतर्गत बदल्या केल्या. सोमवारी १५ मे रोजी हे सर्व कर्मचारी नियुक्ती दिलेल्या विभागांमध्ये आणि कार्यालयांमध्ये आपापल्या पदाचा पदभार घेणार आहेत. बदल्या झालेल्या या कर्मचाऱ्यांमध्ये कार्यालयीन अधीक्षक, वरिष्ठ मुख्य लेखनिक, मुख्य लेखनिक, वरिष्ठ श्रेणी लिपिक, कनिष्ठ श्रेणी लिपिक, वाहन चालक आणि शिपाई यांचा समावेश आहे.

वरिष्ठ श्रेणी लिपिक सेवकांची वरिष्ठ मुख्य लेखनिक या पदावर पदोन्नतीचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. यानुसार नगरसचिव कार्यालयातील वरिष्ठ मुख्य लेखनिक झालेले सिद्राम गुडदोर यांची नेमणूक महापालिका निवडणूक कार्यालयाकडे करण्यात आली आहे. तसेच पदोन्नती मिळालेले कार्यालय अधीक्षक वरिष्ठ मुख्य लेखनिक वरिष्ठ श्रेणी लिपिक आणि शिपाई अशा ७ कर्मचाऱ्यांची महापालिकेच्या अंतर्गत विभागांमध्ये पदोन्नतीने नियुक्ती केली आहे. याचबरोबर वरिष्ठ मुख्य लेखनिक, कनिष्ठ श्रेणी लिपिक, संगणक चालक आणि शिपाई या पदाच्या १८ कर्मचाऱ्यांना पदोन्नती मिळाल्यानंतर त्यांची नेमणूक महापालिकेच्या विविध विभागात आणि कार्यालयात करण्यात आली आहे. याबाबतचे कार्यालयीन आदेश महापालिका आयुक्त शीतल तेली- उगले यांनी काढले आहेत.

### एलबीटी विभाग केला बंद

महापालिका आकृतीबंध २१ डिसेंबर २०२१ रोजी मंजूर झाला आहे. यानुसार स्थानिक संस्था कर कार्यालय हे बंद करून या कार्यालयातील सर्व कर्मचारी आणि संपूर्ण विभाग हा कर आकारणी विभागाकडे वर्ग करण्यात आला आहे. यामुळे आयात कर कार्यालयाकडील आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांची मंजूर आस्थापना असलेल्या कार्यालयाकडे वर्ग करणे आवश्यक आहे. यावरूनच महापालिका प्रशासनाने या विभागातील वरिष्ठ श्रेणी लिपिक, कनिष्ठ श्रेणी लिपिक, वाहन चालक, शिपाई अशा २७ कर्मचाऱ्यांची नेमणूक ही कर आकारणी विभागाकडे करण्यात आली आहे.



# आसरा चौकात संभाजीराजेंच्या मूर्तीची स्थापना

**सोलापूर** : छत्रपती संभाजी महाराज यांच्या ३६६ व्या जयंतीनिमित्त संभाजी ब्रिगेड संचलित स्वराज रक्षक शंभूराजे मध्यवर्ती मंडळाच्या वतीने आसरा चौकात छत्रपती संभाजी महाराजांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना मोठ्या जल्लोषात करण्यात आली. शिवसेना जिल्हाप्रमुख अमोल शिंदे यांच्या महाराज यांना अभिवादन करून मूर्तीची पूजा करण्यात आली. यावेळी मंडळाचे संस्थापक शाम कदम, उत्सव अध्यक्ष अरविंद शेळके, नरेश घोरपडे, पंकज काटकर, जिल्हाध्यक्ष संभाजी भोसले, राम गायकवाड, शिरीष जगदाळे, शेखर जगदाळे, राम माने, घोषभूषण काळे यांची प्रमुख उपस्थिती होती. कल्याण नगर ते आसरा चौक या मार्गावरून छत्रपती संभाजी महाराजांच्या वेशभूषेतील कार्यकर्ते बबन डिंगणे यांची उंटावरून भव्य मिरवणूक काढण्यात आली. छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त गरिबांना धान्याचे किट देण्यात आले. यावेळभ सिताराम बाबर, रमेश चव्हाण, सनी पाठवू, अमित गायकवाड, किशोर कदम, ओंकार कदम, सचिन होनमाने, नितीन होनमाने, संजय चव्हाण आदी उपस्थित होते.

# बार्शीतील सेंट जोसेफस स्कूलचे दहावी परिक्षेत यश

**बार्शी** : सीबीएसई बोर्डाच्या दहावी परिक्षेत बार्शीतील सेंट जोसेफस स्कूलने घवघवीत यश मिळवले आहे. या स्कूलचे ११ विदयार्थी हे प्रथम श्रेणीत, ३ विदयार्थी द्वितीय श्रेणीत तर तब्बल ८० विदयार्थी हे डिस्टींक्शन मध्ये उत्तीर्ण झाले आहेत. श्रेयस पोकळे हा ९८.८० टक्के गुण मिळवून प्रशालेत प्रथम, आर्यन मोरे हा ९८.४० टक्के गुण मिळवून शाळेत द्वितीय तर प्रगती सोमाणी व सिध्दार्थ जगताप हे दोघे ९८.२० टक्के गुण मिळवून शाळेत तृतीय आले आहेत. वरद मोरे ९७.६०, प्रथमेश लिंगायत ९७.४०, समृध्दी देवकर ९६.६०, सृष्टी शेंडगे ९६.६०, अयान शेख ९६.४०, सार्थक येवनकर ९६.४०, मुफइझल पठाण ९६.२०, दर्शन मुळे ९६.२०, प्रणव घोळवे ९६, सुनिती ढगे ९५.६०, कादंबरी काशीद ९५.६०, पार्थ मनगिरे ९५.४०, शांभवी नवले ९५.२०, महिन खोंडे ९५.२०, श्रीनिवास रायचुरकर ९५, जिज्ञेशा कांबळे ९५, कोशिक मेहता ९४.८०, तनिष्का तावसकर ९४.४०, राघव सहस्त्रबुध्दे ९४.२०, प्रथम दोशी ९२.६०, जिगीशा कुलकर्णी ९२.२०, कला ढगे ९२.२०, नेहा कांकरिया ९२, प्रभात लोखंडे ९१.२०, रौनक भोसले ९१.२०, मिताली जाधवर ९१, रिंध्दी भोसले ९०.४०, पार्थ मोरे ९० टक्के गुण मिळवत उत्कृष्ठ यश संपादन केले. विदयार्थ्यांनी मिळवलेल्या या यशाबद्दल वर्गिस पुरमचीरयील यांनी अभिनंदन केले.

# कीर्तनकार चारुदत्त आफळे यांचे तीन दिवस कीर्तन




**सोलापूर** : अखिल भारत पद्मशाली पुरोहित वैदिक ज्ञानपीठ श्रीराम जन्मोत्सव समिती पूर्व विभाग मध्यवर्ती गणेशोत्सव मंडळांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय कीर्तनकार चारुदत्त आफळे बुवा यांच्या सामाजिक प्रवचन मालेचे आयोजन करण्यात आले आह, अशी माहिती शुभांगी बुवा यांनी पत्रकार परिषदेत दिली .सोमवार दिनांक १५ मे ते दिनांक १७ मे दरम्यान दररोज सायंकाळी सहा वाजता कु चन प्रशाला येथे ही सामाजिक प्रवचन माला चालणार आहे. असे संजय साळुंखे यांनी यावेळी सांगितले. धर्माच् धर्मरक्षणातून राष्ट्रीयत्व व आपले कर्तव्य या विषयावर राष्ट्रीय कीर्तनकार चारुदत्त बुवा माफळे मार्गदर्शन करणार आहेत. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन अखिल भारत पद्मशाली पुरोहित वैदिक ज्ञानपीठ श्रीराम जन्मोत्सव समितीकडून करण्यात आले आहे.



# मंदाकिनी पाटील यांचे निधन

**सोलापूर** : समर्थ नगर देगांव रोड येथील रहिवासी रेल्वे स्टेशन येथील रहिवासी मंदाकिनी पाटील (वय-७०)यांचे निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात चार मुली नातवंडे असा परिवार आहे. पेपर विक्रेते सुधीर जाधव यांच्या त्या सासू होत.

# आता जि. प. शाळेत एलकेजी, युकेजीचे वर्ग सुरू होणार



सुराज्य/सोलापूर

जिल्हा परिषद शाळेत प्रायोगिक तत्त्वावरएलकेजी, युकेजीचे वर्ग सुरू करण्याची कल्पना मांडताना स्वामी यांनी उपस्थित अधिकाऱ्यांशी सखोल चर्चा केली. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण समजून घ्या असे सांगत जिल्ह्यात प्रभावीपणे राबवले पाहिजे अशा सूचना केल्या. एलकेजी युकेजी वर्ग सुरू करणे धोरणात नसले तरी आपण प्रायोगिक तत्त्वावर सुरू करू शकतो त्याला कोणतीही हरकत नाही जर आपण प्रभावीपणे हे वर्ग चालवले तर निश्चितच राज्यात ही संकल्पना राबवली जाईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

समग्र शिक्षा व स्टार्स प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणी करिता सोलापूर जिल्हा परिषदेच्या वतीने जिल्हास्तरीय शिक्षण परिषद एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन शनिवारी यशवंतराव चव्हाण सभागृहात करण्यात आले. या कार्यशाळेला मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी मार्गदर्शन केले . व्यासपीठावर माध्यमिक शिक्षणाधिकारी जावेद शेख, प्राथमिक शिक्षणाधिकारी संजय जावीर, शिक्षण अधिकारी योजना सुलभा वटारे, डायट वेळापूरचे प्राचार्य डॉ रामचंद्र कोरडे, अधिव्याख्याता डॉ इब्राहिम नदाफ, अधिव्याख्याता डॉ क्रांती कुलकर्णी, डॉ इरफान इनामदार, पर्यवेक्षिक राजश्री जंबेनाळ यांची प्रमुख उपस्थिती होती. यासह जिल्ह्यातील सर्व बालविकास प्रकल्प अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी व केंद्रप्रमुख असे क्षेत्रीय स्तरावरील सुमारे २०० अधिकारी परिषदेस हजर होते .

या परिषदेत विद्यार्थी आधार अपडेशन व संचमान्यता याविषयी माध्यमिक शिक्षणाधिकारी जावेद शेख यांनी मार्गदर्शन केले. शिक्षणाधिकारी (योजना) सुलभा वटारे यांनी विविध शासकीय विद्यार्थी लाभार्थी योजनांची माहिती दिली.

मुख्यालयातील विस्तार अधिकारी श्रीमती स्वाती स्वामी यांना स्वच्छता अभियान अंतर्गत लेट्स चेंज या उपक्रमात राज्यस्तरावरील उत्कृष्ट जिल्हा समन्वयक म्हणून सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच सोलापूर जिल्हा राज्यात बेस्ट ऑफ फाईव्ह ठरल्याबद्दल प्राथमिक शिक्षणाधिकारी संजय जावीर यांना सन्मानपत्र वितरित करण्यात आले.

# १६ मे ला व्यापारी, रेडिमेड कारखानदार व शिलाई कामगार यांचा आक्रोश मोर्चा

सुराज्य/सोलापूर

गेल्या महिन्याभरापासून संपूर्ण महाराष्ट्रात शालेय विद्यार्थ्यांच्या गणवेशबाबत राज्य सरकार स्वतः गणवेश खरेदी करून वितरीत करण्याचा निर्णय विचाराधीन आहे. या निर्णयामुळे सोलापुरातील छोटे-मोठे ७०० कारखाने, २०० दुकाने आणि यामध्ये जवळपास काम करणाऱ्या ५० हजार कामगारांच्या उपजीविकेवर टांगती तलवार आलेली आहे.

या निषेधार्थ सिटू चे नेते माजी आमदार कॉ. नरसय्या आडम (मास्तर) यांच्या नेतृत्वाखाली १६ मे २०२३ रोजी सोलापूरला नियोजन भवनावर आक्रोश मोर्चा काढण्याचा निर्धार करण्यात आलेला आहे. १३ मे २०२३ रोजी सिटू चे मध्यवर्ती कार्यालय दत्त नगर येथे रेडीमेड कारखानदार, व्यापारी, कामगार यांची संयुक्त बैठक माजी आमदार कॉ. नरसय्या आडम (मास्तर) यांच्या उपस्थितीत पार पडली. या बैठकीत सोलापुरातील रेडीमेड व शिलाई क्षेत्रात काम करणारे कामगार, कारखानदार आणि व्यापारी असे ५० हजार कामगार लाक्षणिक संपावर जाणार आहेत. प्रश्न घेऊन व्यापारी, कारखानदार, कामगार काळ्या टोपी, काळे वस्त्र, काळे झेंडे घेऊन निषेध करत आक्रोश मोर्चा काढण्याचा निर्धार करण्यात आलेला आहे. या विरुद्ध १६ मे २०२३ रोजी सकाळी १० वाजता हजारो कामगारांचा आक्रोश मोर्चा काढण्याचा निर्णय सिटू ने घेतलेले आहे. हा मोर्चा शांततेत व कायदा सुव्यवस्था अबाधित राखत काढण्यात येणार आहे. बैठकीस क्षेत्रीय गल्ली रेडीमेड व्यापारी असोसिएशन व शिलाई कंत्राटदार व वीरेंद्र पद्मा, बाळकृष्ण मल्याळ आदि उपस्थित होते.

# जि. प. मध्ये संभाजी राजे जयंती निमित्त कार्यक्रम

सुराज्य/सोलापूर


जिल्हा परिषद, सोलापूर मराठा सेवासंघ शाखेतर्फे छत्रपती संभाजी महाराज जयंती जिल्हा परिषदेमध्ये साजरी करण्याचा निर्णय घेणेत आल्याची माहिती मराठा सेवा संघाच्या जिल्हा परिषद शाखेचे अध्यक्ष अविनाश गोडसे यांनी सांगीतले.

रविवार, १४ रोजी सकाळी ११.०० वा. यशवंतराव चव्हाण सभागृह जिल्हा परिषद मध्ये छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेस मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करणेत येईल. मराठा सेवा संघ शाखेतर्फे जिल्हा परिषदेच्या यशवंतराव सभागृहामध्ये सुरेश पवार गुरूजी (मंगळवेढा) व्याख्यान आयोजीत केले आहे.

# अल्पवयीन मुलीचा विनयभंग व अपहरण; तरुणावर गुन्हा

सुराज्य/बार्शी

अल्पवयीन मुलीचा विनयभंग करून पळवून नेल्याप्रकरणी एकावर विनयभंग, अपहरण व पोक्सोअन्वये गुन्हा दाखल झाला आहे. प्रशांत तुळशीराम भोसले (वय २० रा. नागोबाचीवाडी ता.बार्शी) असे गुन्हा दाखल झालेल्या संशयित आरोपीचे नांव आहे. पीडीतेच्या आईने फिर्याद दिली आहे.





७ डिसेंबर २०२१ रोजी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास पीडीत मुलगी शाळेत जात असताना प्रशांतने तिचा पाठलाग करून तिला त्रास दिला होता. त्यावेळी त्याने पीडीतेच्या भावालाही मारहाण केली होती तसेच तिच्या कुटूंबियांना धमकी दिली होती.

त्यानंतर दि. १३ मे २०२३ रोजी रात्री १२.३० वाजण्याच्या सुमारास आरोपी प्रशांत पीडीतेस तिच्या कुटूंबियाच्या संमतीविना पळवून घेवून गेला. पळवून घेवून जात असताना राळेरास येथे वैराग पोलीसांनी पकडले. त्यांनी बार्शी तालुका पोलीस ठाणे येथे त्या दोघांना आणले. तिच्या कुटूंबियांनी याबाबत फिर्याद दिली.

# व्यंकटेश ला-आर्का प्रोजेक्टला बेस्ट रियल इस्टेट पुरस्कार प्रदान

## प्रमोद साठे यांच्या स्पॅनिश थीमची देशपातळीवर दखल

सुराज्य/सोलापूर





स्पेन इन सोलापूर या थीमवर आधारित साकारत असलेल्या व्यंकटेश ला-आर्का या प्रोजेक्टला देशपातळीवरील बेस्ट रियल इस्टेट पुरस्कार मुंबई येथे एका विशेष समारंभात पद्मश्री, अभिनेत्री माधुरी दीक्षित यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

देश आणि परदेशातील विविध क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या ५० जणांना ब्रँड एमपॉवर या नवी दिल्ली येथील संस्थेच्यावतीने हा पुरस्कार देण्यात आला. पद्मश्री, अभिनेत्री माधुरी दीक्षित, संस्थेचे प्रमुख राहुल रंजनसिंग यांच्या हस्ते व्यंकटेश ला-आर्काचे चेअरमन प्रमोद साठे आणि कार्यकारी संचालक आकाश साठे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. विजापूर रस्त्यावर निसर्गाच्या सान्निध्यात हा प्रकल्प साकारत आहे. या प्रकल्पाची देशपातळीवर दखल घेतल्याने व्यंकटेश ला-आर्काच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. साठे यांच्या या प्रकल्पाचे अभिनेत्री माधुरी दीक्षित आणि संस्थेचे प्रमुख राहुल रंजनसिंग यांनी कौतुक करतानाच अशा प्रकारचे प्रकल्प देशातील विविध शहरांमध्ये साकारले पाहिजेत, अशी अपेक्षा व्यक्त केली.

### पुढील काळातही नवीन प्रयोग करू

सोलापूर शहरात प्रथमच स्पेन इन सोलापूर या थीमवर आधारित प्रकल्प सुरू केला. त्याला भरभरून प्रतिसाद मिळाला. स्पॅनिश थीमची दखल देशात पहिल्या तीन संस्थांमध्ये असलेल्या दिल्लीच्या ब्रँड एमपॉवर या संस्थेने घेतली, हे आमच्यासाठी खूप महत्त्वाचे असून यापुढील काळातही अशा प्रकारचे नवनवीन प्रयोग करण्याचा आपला प्रयत्न राहील.

– **प्रमोद साठे, चेअरमन**

# दुध भेसळ करणाऱ्यांवर मोक्का अंतर्गत गुन्हे दाखल करा

## रयत, भाजप किसान मोर्चाची आ.पडळकराकडे मागणी

सुराज्य/सोलापूर

*जिल्ह्यातील दूध उत्पादकांची मागील काही दिवसांपासून खाजगी दुध संघाकडून गळचेपी सुरू आहे अनेक दूध संघांनी चाळीस रुपयाचा दूध दर ३४ रुपयांवरती आणला आहे. उन्हाळ्यामध्ये दुधाची उत्पादकता कमी असताना आणि मागणी व पुरवठा यातील तफावत पाहता दुधाचे दर हे वाढायला पाहिजेत मात्र काही दूध संघांनी जाणीवपूर्वक हे दूध दर कमी केले आहेत यामध्ये दूध संघ आणि सरकारची मिली भगत असल्याचा आरोप दूध उत्पादक शेतकऱ्यांनी केला आहे.*

या दर कपाती विरोधात शेतकरी आक्रमक झाला असून रस्त्यावर उतरण्याच्या तयारीत आहे. तर रयत क्रांती संघटना व भाजप किसान मोर्चाने या शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी भाजप आ.गोपिचंद पडळकर यांची भेट घेऊन सरकार कडून न्याय मिळवून देण्याची मागणी केली आहे.

सोलापूर जिल्ह्यात दुध मोठ्या प्रमाणात घेतले जाते. वाढते पशुखाद्याचे दर ,जनावरांच्या चारा,औषधावरील होणारा खर्च यामुळे दुध व्यवसाय परवडत नाही परंतु शेतीला जोडधंदा म्हणून व उपजिविकेसाठी तो करीत आहे.याचा मोठा फटका दूध उत्पादक शेतकऱ्यांना बसत आहे. अनेक बेरोजगार युवक बँकांकडून कर्ज काढून या धंद्याकडे वळत आहेत. राज्याच्या बाहेरचे संघ जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी २ ते अडीच रूपये जास्तीचा दर देत आहेत.मात्र आपल्याच राज्यातील काही दूध संघ जाणीवपूर्वक दुधाचे दर पाडण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र यावरती सत्ताधारी आणि विरोधक बोलायला तयार नाहीत. तात्काळ या दूध संघाने पाडलेले दुधाचे दर पूर्ववत करावेत अन्यथा तीव्र आंदोलन करावा लागेल असा इशारा दूध उत्पादक शेतकऱ्यांनी दिला आहे. यावेळी रयत क्रांती संघटनेचे दिपक भोसले ,माऊली हळणवर याचे सह कार्यकर्ते उपस्थित होते. .



सोनाई दुध संघ व नेचेर डिलाईट,आपटे संघ या दुध संघांनी ऐन उन्हाळ्यात दुधाचा कुठलाही अतिरिक्त पुरवठा नसताना दर कमी केले आहेत व संघाचे प्रमुख हे व इतर मालक हे जास्त दर देणाऱ्या हटसन ,व अमुल याचेवर दर कमी करा म्हणून दबाव टाकत आहेत.सोनाई ,नेचर डेअरी ही राष्ट्रवादीशी संबंधीत असुन शिंदे फडणवीस सरकार बदनाम व्हावे या करीता हा डाव रचला जात आहे. दुधभेसळ करणाऱ्यांवर मोक्का अंतर्गत गुन्हे दाखल व्हायला पाहिजे या मागण्याचे निवेदन आ गोपिचंद पडळकर यांना दिले आहे.

– **माऊली हळणवर**
भाजप किसान मोर्चा प्रदेश सचिव

### खासगी दूध संघाच्या मनमानीला लगाम लावणार

दुध उत्पादक शेतकऱ्यांचे शिष्टमंडळ मी व माजी मंत्री सदाभाऊ खोत यांच्यासह लवकरच राज्याचे मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री व दुध विकासमंत्री राधाकृष्ण विखे याच्या सोबत बैठक घेऊन या प्रश्नावर तात्काळ तोडगा काढला जाईल व मस्तवाल झालेल्या खाजगी दुध संघावर कार्यवाही करण्यास सरकारला भाग पाडू सरकार शेतकरी बाधंवाचे पाठीशी ठाम पणे उभे आहे.मनमानी करून शेतकऱ्यांची लुट करणाऱ्या संघावर सरकारच्या माध्यमातून कारवाई निश्चित करू.

– **आ.गोपिचंद पडळकर**

# कर्नाटकात काँग्रेसची सत्ता; सोलापुरात नेते, कार्यकर्त्यांचा जल्लोष

सुराज्य/सोलापूर

**कर्नाटक विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाचा विजय झाला. त्याचा सोलापुरात शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने जल्लोष करण्यात आला. बाळीवेस येथील विजयी चौकात शहराध्यक्ष चेतन नरोटे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना जिल्हा प्रमुख पुरुषोत्तम बर्डे, राष्ट्रवादी शहर अध्यक्ष भारत जाधव, शिवसेना शहर अध्यक्ष विष्णु कारमपुरी, माजी आमदार विश्वनाथ चाकोते, राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते प्रमोद गायकवाड, यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला.**



यावेळी बोलताना शहर अध्यक्ष चेतन नरोटे म्हणाले की, कर्नाटक निवडणुकीत प्रधानमंत्री मोदी यांनी ही स्वतः च्या प्रतिष्ठेची निवडणूक बनवली होती. पूर्ण ताकद पणाला लावली होती. बजरंगबली आणि धार्मिक ध्रुवीकरणाची निवडणूक बनवली होती. पण काँग्रेसने स्थानिक आणि लोकांसाठी महत्वाच्या असणाऱ्या मुद्द्यांवर लढली महागाई, बेरोजगारी, गॅस सिलेंडर किंमतींची आठवण, भाजपचा ४० टक्के भ्रष्टाचार, धार्मिक ध्रुवीकरण या विषयांवर निवडणूक लढली. ही निवडणूक कौल स्पष्टपणे दर्शवतो कर्नाटक मधील जनतेने धार्मिक मुद्द्यांचा पुढे जाऊन हुकुमशाही संपविण्याकरीता आपला मतदानाचा हक्क बजावला आहे देशात आता धार्मिक ध्रुवीकरण चालणार नाही हे स्पष्ट आहे. आ. प्रणिती शिंदे यांच्यावर ज्या दावनगिरी लोकसभा क्षेत्रातील आठ विधानसभा सहा ठिकाणी काँग्रेस पक्षाचे उमेदवार निवडून आले आहेत. आगामी काळात महाराष्ट्रात सुद्धा याचा प्रभाव पडून महाराष्ट्रात महाविकास आघाडीचा विजय होईल.

यावेळी महिला अध्यक्ष हेमाताई चिंचोळकर, प्रदेश चिटणीस नरसिंग आसादे, माजी महापौर सुशिलाताई आबूटे, मा. नगरसेवक हाजी तौफ़िक़ हत्तूरे, विनोद भोसले, मा. वैष्णवीताई करगुळे, युवक अध्यक्ष गणेश डोंगरे, शिवसेनेचे प्रताप चव्हाण, महेश धाराशिवकर, संतोष केंगनाळकर, संभाजी कोंडगे, हरिदास दुद्याल, राष्ट्रवादीचे प्रमोद भोसले, श्यामराव गांगर्डे, संजय जाबा, विजय भोईटे, काँग्रेसचे अंबादास करगुळे, ब्लॉक् अध्यक्ष देवाभाऊ गायकवाड, भीमाशंकर टेकाळे, वाहिद बिजापुरे, छ्य क्षीरसागर, अंबादास गुत्तिकोंडा, विश्वनाथ साबळे, नागनाथ कदम, हाजीमलंग नदाफ, रॉकी बंगाळे, सिद्राम अट्टेलूर, तिरुपती परकीपंडला, हनमंतु सायबोलू, दिनेश म्हेत्रे, सिद्धाराम चाकोते, सिद्राम आनंदकर, जाबिर अल्लोळी, अशोक कल्शेट्टी, अनिल मस्के, प्रवीण वाले, यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

### कार्यकर्त्यांनी केली घोषणाबाजी

यावेळी काँग्रेस पक्षाचा विजय असो, जय बजरंगबली तोड़ दिया भाजपाकी नली, जय बजरंगबली तोड़ दिया भ्रष्टाचार की नली, राहुल गांधी तुम संघर्ष करो हम तुम्हारे साथ है, महाविकास आघाडीचा विजय असो, आ. प्रणिती शिंदे तुम आगे बढ़ो हम तुम्हारे साथ है, आदी घोषणाबाजी करण्यात आली.

# घरासमोर लावलेली मोटारसायकल पेटवली

सुराज्य/बार्शी

घरासमोर लावलेली मोटारसायकल पेटवून देवून नुकसान केल्याप्रकरणी दोघांवर बार्शी शहर पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे. उमेश शेट्टी व सोनू वायकर (रा. मांगडे चाळ, बार्शी) अशी गुन्हा दाखल झालेल्या संशयितांची नावे आहेत. हसिना दस्तगीर मुलाणी रा. भवानी पेठ, बार्शी यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. दि. ११ मे रोजी उत्तररात्री सव्वा वाजण्याच्या सुमारास ही घटना निदर्शनास आली. हसिना यांचा मुलगा सरताज यांने ११ रोजी रात्री १०.३० च्या सुमारास त्याची मोटारसायकल एम एच १३ डीपी ४९२३ ही घराशेजारी हॅण्डल लॉक करून लावली होती. रात्री ११.३० च्या सुमारास हे कुटूंब झोपी गेले. रात्री १.१० च्या सुमारास घराचे बाहेर आवाज आल्याने हिसना उठल्या. बाहेर जावून पाहिले असता उमेश व सोनू मोटारसायकलला आग लावताना दिसले. सर्वजण घरातून बाहेर येताच उमेश व सोनू तेथून पळून गेले.

**विवाहितेचा छळ; चौघांवर गुन्हा**

दोन लाख रुपये माहेरून आन म्हणत तगादा लावून सासरच्या मंडळींनी विवाहितेला शारीरिक व मानसिक त्रास दिल्याप्रकरणी वैशाली सतीश घुगे (वय-३५,रा.धनश्री नगर, जुळे सोलापूर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात दिली आहे. पती सतीश आत्माराम घुगे,सासू जयश्री घुगे,ननंद प्रियांका घुगे,प्रज्ञा घुगे (सर्व.रा. ठाणे) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.



## सरपंच परिषदेच्या प्रदेश उपाध्यक्षपदी ॲड. जाधव

**बार्शी** : सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्राच्या पदाधिकाऱ्यांची नुकतीच शिर्डी या ठिकाणी राज्यस्तरीय कार्यशाळा आयोजित केली होती. या वेळी सरपंच परिषदेच्या प्रदेश कार्यकारणीत अनेक फेरबदल करण्यात आले अनेक जिल्ह्यांच्या जिल्हाध्यक्षांच्याही निवडी करण्यात आल्या. यात प्रदेश उपाध्यक्षपदी ॲड. विकास जाधव यांची निवड करण्यात आली. सरपंच परिषदेच्या स्थापनेपासून संस्थापक सरचिटणीस म्हणून ड विकास जाधव यांनी काम केले आहे. त्यांची दोन वेळा प्रदेश सरचिटणीस म्हणून निवड झाली होती. या पदावर काम करत असताना अनेक सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्यांच्या समस्या सोडवण्यासाठी जाधव यांनी आक्रमक भूमिका घेतली होती. सोलापूर जिल्ह्याचा विकास जाधव यांच्या नेतृत्वाखाली घेतला होता. तसेच बार्शी या ठिकाणीही पहिला सरपंचांचा मेळावा घेतला होता. त्यामुळे जाधव यांना शिर्डी येथील पदाधिकाऱ्यांच्या मेळाव्यात सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ता काकडे व विश्वस्तांनी प्रदेश उपाध्यक्ष पदाची जबाबदारी दिली. यावेळी विकास जाधव यांच्यासह आजरा येथील राजीव पोतणीस यांची प्रदेश सरचिटणीस पदी तर आबासाहेब सोनवणे पाटील यांची प्रदेश कमिटी सदस्य पदी निवड झाली. यावेळी प्रदेश विश्वस्त किसनराव जाधव, राज्य प्रसिद्धी प्रमुख संजय जगदाळे, महिला उपाध्यक्ष अश्विनी थोरात, सुषमा डेसले यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

# छत्रपती कॉलनी ओपन स्पेस प्रकरणी प्लॉट धारकांना न्यायालयाचा दिलासा

सुराज्य/बार्शी

बार्शी शहरातील गट नंबर ६४८ मधील ओपन स्पेस जागा प्लॉट धारकांच्या हक्काची व वापराची जागा असताना त्या जागेचे कागदपत्रे हेराफेरी करून अनेक प्रकारे हस्तांतरण केले त्याप्रकरणी खरेदीदार यांना सदर मिळकत हस्तांतरण करू नये व वादींना म्हणजेच प्लॉट धारकांच्या वापरा स हरकत अडथळा करू नये असे तुरतात मनाई चे बार्शी न्यायालयाचे अंतरिम आदेश झाले आहेत. त्यामुळे मूळ मालक संबंधित अधिकारी व बेकायदेशीर खरेदीदार यांच्या अडचणीत वाढ झाली आहे

गट नंबर ६४८ मधील प्लॉट धारक विदुर कोल्हे, हनुमंत काळे, राजेश चोप्रा, विक्रम निमकर, रमेश देशमुख यांनी जिल्हाधिकारी, बार्शी तहसीलदार, बार्शी नगरपरिषद, मूळ जमिनीचे मालक ताराबाई नलवडे व बेकायदेशीर खरेदीदार अंजली जगदाळे व शेखर मस्के यांचे विरुद्ध ओपन स्पेस जागाही प्लॉट धारकांच्या मालकीची असताना कागदपत्रे हेराफेरी करून व प्लॉट धारकांची फसवणूक करून खरेदी खते नोंदवलेले आहेत. वास्तविक पाहता ओपन स्पेस जागेत प्लॉट धारकांनी तारेचे कंपाउंड केले आहे. लोकसहभागातून झाडे लावली आहेत लोकांना बसण्यासाठी बाकडे ठेवले आहेत. तरीही त्यामध्ये नगरपरिषदेने बेकायदेशीर गुंठेवारी केले आहे तहसीलदारांनी बेकायदेशीरपणे बिनशेती परवाना दिला आहे असे आरोप करून संबंधित खरेदीखत रद्द करण्यासाठी व गुंठेवारी व बिनशेतीचे आदेश रद्द करण्यासाठी बार्शी दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर यांचे समोर ॲड. विकास जाधव यांच्यातर्फे दावा दाखल केला होता. तुर्तातूर्त मनाईचे अर्जावर सुनावणी होऊन दिवाणी न्यायालयाचे वरिष्ठ न्यायाधीश ए. पी खानोरकर यांनी निर्णय देताना वरील आदेश पारित केले आहेत. प्लॉट धारकांच्या वतीने न्यायालयात ॲड. विकास जाधव, ॲड. अक्षय काशीद यांनी बाजू मांडली

# इंडियन मॉडेल स्कूलचे सी.बी.एस.ई. बोर्ड परीक्षेत यश !

सुराज्य/सोलापूर



दरवर्षीप्रमाणेच या वर्षीसुध्दा इंडियन मॉडेल स्कूलने यशाची परंपरा कायम राखली आहे. फेब्रु.-मार्च २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या १० वी सी.बी.एस.ई. बोर्डाच्या परीक्षेचा इंडियन मॉडेल स्कूलचा निकाल १०० टक्के लागला आहे इ.१० वी ची ही ११ वी बॅच होती. या शाळेने १०० टक्के निकालाचे सातत्य सलग ११ वर्षे राखले आहे.

यावर्षी एकूण १६५ विद्यार्थी दहावीच्या परीक्षेला बसले होते. त्यापैकी ५९ विद्यार्थ्यांना ९० टक्के पेक्षा जास्त गुण मिळाले आहेत. चि. हर्षवर्धन अरविंद बागलकोटे हा विद्यार्थी ९७.८७ टक्के घेऊन शाळेत प्रथम आलेला आहे. आरुषी येमुल ९७.४७ टक्के व अनिश कारंडे हे विद्यार्थी ९७.४७ टक्के गुण घेऊन शाळेत दुसरे आलेले आहेत. तर श्रीनिवास गायकवाड हा विद्यार्थी ९६.८७ टक्के घेऊन शाळेत तृतीय आला आहे.

स्वराली इंगळे, हर्षाली मोरे, आदित्य बागमार या विद्यार्थ्यांनी ९६.६७ घेऊन चौथा क्रमांक मिळवला आहे. तसेच कु. नयन कुलकर्णी, कु. जान्हवी नागेश तळे, चि. सायुज्ज सारंग आपटे व प्रसाद कुलकर्णी या विद्यार्थ्यांनी ९६.४७ टक्के घेऊन पाचवा क्रमांक मिळवला आहे.

गणित या विषयात हर्षवर्धन बागलकोट, आयुष स्वामी या विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० गुण प्राप्त केले आहे. इंग्लिश या विषयात अनिष कारंडे व चि. नयन कुलकर्णी या विद्यार्थ्यांनी १०० पैकी ९९ गुण मिळवले आहेत. मराठी या विषयात स्वराली इंगळे, हर्षाली मोरे, कु. उर्वी खरात या विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० गुण मिळवले आहेत. विज्ञान या विषयात चि.अनिष कारंडे, आदित्य बागमार या विद्यार्थ्यांनी १०० पैकी ९७ गुण मिळवले आहेत. सोशल सायन्स या विषयात कु.स्वराली इंगळे, चि.सर्वेश टोणपे, उर्वी खरात, चि.पुष्कराज पाटील व चि. अनुश सन्नके या विद्यार्थ्यांनी १०० पैकी ९९ गुण मिळवले आहेत. हिंदी या विषयात कु. शांभवी सोनी या विद्यार्थीनीने १०० पैकी ९६ गुण मिळवले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांचे इंडियन मॉडेल स्कूलचे अध्यक्ष प्रा. ए.डी. जोशी, सचिव अमोल जोशी, सायली जोशी , मुख्याध्यापिका मानसी जोशी, अपर्णा कुलकर्णी, ममता बसंवती, सौ. अचला राचर्ला, सुजाता बुट्टे, रुही काझी व सर्व शिक्षकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



## चांदीच्या गदेचा मानकरी ठरला कोल्हापूरचा भोसले

**अक्कलकोट** : अक्कलकोट तालुक्यातील हंजगी येथे श्री बमलिंगेश्वर यात्रेनिमित्त नामांकित पैलवानांचे जंगी कुस्ती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यामध्ये कोल्हापूरचा सुमित भोसले यांनी बाजी मारत चांदीची गदा पटकावली. याच जंगी कुस्ती कार्यक्रमाने बमलिंगेश्वर यात्रेची सांगता करण्यात आली. शेवटच्या कुस्तीसाठी विजेत्या मल्लांना रोख तीस हजार रुपये व चांदीची गदा बक्षीस म्हणून ठेवण्यात आली होती. चांदीची गदा व रोख पारितोषिक दर्गनहळ्ळी ( ता.दक्षिण सोलापूर) येथील युवा उद्योजक महेश बिराजदार यांच्याकडून ठेवण्यात आली होती.शेवटची कुस्ती म्हैसूर चे पैलवान अमोल पाटील व कोल्हापूर चे पैलवान सुमित भोसले यांच्यात झाली. मल्ल सुमित भोसले यांनी म्हैसूर च्या अमोल पाटील यांना चितपट करीत 'श्री बमलिंगेश्वर केसरी' चे मान पटकावला. हनुमान प्रतिमेचे व आखाड्याचे पूजन व महेश दादा बिराजदार यांच्या हस्ते करण्यात आला.यावेळी काशिनाथ दोडतले,उमेश पैलवान,देविदास पवार,रमेश क्षीरसागर,रेवणसिद्ध कुंभार,संतोष म्हमाणे,बाबुराव पांढरे,बाळासाहेब पाटील,श्रीशैल पाटील,दादाराव पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. होते.यावेळी पंच म्हणून उमेश पाटील, रमेश क्षीरसागर ,देविदास पवार,रेवणसिद्ध कुंभार यांनी काम पाहिले.

# पाणीपुरवठा योजनेचे काम गुणवत्ता पूर्ण करा : दिलीप माने

## कारंबा येथे विविध विकास कामाचा शुभारंभ

सुराज्य/सोलापूर




केंद्र शासनाच्या जलजीवन मिशन योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या पाणीपुरवठा योजनेचे काम गुणवत्ता पूर्ण करा त्यामुळे भविष्यात दूषित पाणी, लिकेजचा प्रश्न निर्माण होणार नाही. गावच्या विकास कामासाठी काही प्रशासकिय अडचण आल्यास सहकार्य करेन असे माजी आ. दिलीप माने यांनी सांगितले.

कारंबा ग्रामपंचायतीच्या वतीने जलजीवन योजनेअंतर्गत पाणीपुरवठा योजना, चव्हाण वस्ती येथे पाणी टाकी,अंजनी नगर येथे अंतर्गत पाईपलाईन,गरजू महिलांना शिलाई मशीन वाटप तसेच पृथ्वीराज माने युवा मंच ग्रामशाखेचा उद्घाटन झाले. यावेळी ते बोलत होते, अध्यक्षस्थानी ठाकरे गट शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश वानकर होते. यावेळी सिद्धनाथ साखर कारखाना उपाध्यक्ष जाधव, समन्वयक उमेश भगत, अजय सोनटक्के, सरपंच अंजली क्षिरसागर, विश्वजीत भोसले, चंद्रकांत कुलकर्णी,खेड सरपंच जयश्री भोसले, गुळवंची सरपंच दिनकर जगताप, बाबासाहेब पाटील संजय पौळ आदी उपस्थित होते.

जनतेच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवण्यासाठी पाणीपुरवठा योजनेचे काम गुणवत्ता पूर्ण करा. शेत जमीन रिकामी असल्यामुळे पाईपलाईन कामास अडचण येणार नाही. सर्वसामान्य जनतेसाठी अनेक कल्याणकारी योजना असून त्या मिळवण्यासाठी प्रयत्न करा, असे आवाहन माने यांनी केले. केंद्र शासनाने जलजीवन मिशन योजना अंमलात आणली त्यामुळे ग्रामीण भागात विशेषत: महिलांना सोयीची ठरेल असे डॉ. पृथ्वीराज माने यांनी सांगितले. यावेळी गणेश वानकर यांनी देखील गावाच्या विकासासाठी काही अडचण आल्यास शासन लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून सहकार्य करेन असे सांगितले. मस्के यांनी प्रास्ताविक केले. यावेळी संजय वडजे, शहाजी भोसले, शिवानंद पाटील, सागर तांबे, उत्तरेश्वर बुद्दे, चेअरमन विनोद पेंडपाले, विनोद माने, संघाचे संचालक महादेव जाधव, महिबूब शेख, सविता पेंडपाले, पोलीस पाटील श्रीकांत काळे, उपसरपंच ज्ञानेश्वर जगताप, सदस्य दत्ता पवार,ज्योती भोरे,तकदीर शेख आदी उपस्थित होते. आभार काशिनाथ माने व सूत्रसंचालन गुरुराज कुलकर्णी यांनी केले.

# दुचाकी वाहनांसाठी आकर्षक नोंदणी क्रमांकासाठी अर्ज करा

## उप प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांचे आवाहन

सुराज्य/सोलापूर

उप प्रादेशिक परिवहन कार्यालयात लवकरच दुचाकी वाहनांसाठी नवीन मालिका सुरु करण्यात येत आहे. नवीन सुरु होणाऱ्या एमएच १३ ई ई मालिकेतील आकर्षक नोंदणी क्रमांक राखून ठेवण्याकरिता दिनांक १७ मे २०२३ पासून अर्ज स्विकारण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली असल्याची माहिती उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी दिली.



वाहनांची नवीन मालिका चालू होण्याच्या दिवशी उप प्रादेशिक परिवहन कार्यालया गर्दी होते. त्यामुळे कार्यालयीन व्यवस्थेवर त्याचा ताण पडतो व नागरिकांनाही याचा त्रास होतो. नागरिकांना होणारा त्रास कमी व्हावा व त्यांना हवा असणारा आकर्षक नोंदणी क्रमांक उपलब्ध असल्यास त्यांना सुलभतेने मिळावा. यासाठी ज्या दुचाकी वाहन मालकांना आकर्षक तसेच पसंतीचे क्रमांक विहीत शुल्क भरून हवे असतील त्यांनी दिनांक १७ ते १९ मे या कालावधीत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११.ते दुपारी ३ या वेळेत विहीत नमुन्यातील अर्ज सादर करावा. कार्यालयाच्या नवीन नोंदणी विभागात डीडी , पत्याचा पुरावा, ओळखपत्र, पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतीसह जमा करावा, डीडी नॅशनलाईज अथवा शेड्युल्ड बँकेचा असावा. अर्जासोबत पत्त्याच्या पुराव्याची आधार कार्ड, टेलिफोन बीलाची साक्षांकित प्रत सादर करणे आवश्यक असेल.एक नंबरकरिता एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास त्यांची यादी २२ मे रोजी सकाळी ११ वाजता कार्यालयीन नोटीस बोर्डवर लावण्यात येईल, असे सांगण्यात आले आहे.



## कुचन प्रशालेत मोफत तेलुगू वर्गाचे उद्घाटन

**सोलापूर** : पद्मशाली समाज सेवानिवृत्त संघाचे वतीने मोफत तेलुगू वर्गाचे उदघाटन कुचन प्रशाला येथे करण्यात आले. बँक ऑफ इंडियाचे ओबीसी एम्प्लॉईज चे राष्ट्रीअध्यक्ष सुरेश श्रीराम यांच्या अध्यक्षते खाली पद्मशाली शिक्षण संस्थेचे माजी सचिव प्रा. विलास बेत ,सहसचिवा संगीता इंदापुरे,कुचन प्रशालेचे तेलुगू विभागातील सेवानिवृत्त शिक्षक केशव पुंजाल ,भास्कर मदनाल यांच्या उपस्थितीत झाले. यावेळी प्रमुख पाहुण्यांचे सचिव यशवंत इंदापुरे यांनी स्वागत केले. प्रास्ताविक उपाध्यक्ष अनिल कन्ना यांनी केले. या कार्यक्रमास पालिकेचे तेलूगू शिक्षक भास्कर मदनाल, खजिनदार गज्जम, माजी मुख्याध्यापिका साधना बेत, माजी उपाध्यक्ष ॲड.श्रीनिवास क्यातम, संचालिका अरूणा कन्ना, प्राचार्य युवराज मेटे, सुनिता बरदेपूर, उपमुख्याध्यापक मधुकर धर्मसाळे,माजी प्रा.श्रीनिवास कोडम, शाम बेनगिरी, नरेंद्र वडनाल, अन्नपुर्णा गज्जम, अनिल सिलगारी, श्रीनिवास मेरगू आदी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी उपाध्यक्ष अनिल कन्ना,सचिव यशवंत इंदापुरे, सहसचिव सत्यनारायण बरदेपूर, नागनाथ गज्जम ,प्रविण गोप आदींनी परीश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन अनिल कन्ना यांनी केले.

## सोलापूर महापालिकेत होणार मेगा भरती

# ३४० पदासाठी दरवर्षी १५.१५ कोटी वेतन खर्च होणार

सुराज्य/सोलापूर

**सोलापूर : अनेकवर्षानंतर सोलापूर महापालिकेत मेगा भरती करण्यात येत आहे. अत्यावश्यक सेवेतील वर्ग १ ते ४ मधील ३४० पदांचा समावेश आहे. ३४० पदासाठी दरवर्षी १५.१५ कोटी वेतन खर्च होणार आहे. सादारणत: तीन महिन्यांत प्रत्यक्षात भरतीसाठी अर्ज, परीक्षा आदी प्रक्रिया पार पाडली जाईल. सुमारे ६० हजार हजार इच्छुक उमेदवार यात सहभागी होतील अशी शक्यता वर्तवली जात आहे.**



सोलापूर महापालिकेकडील आकृतीबंधनुसार एकूण ४६१२ इतकी मंजूर असून त्यापैकी ११७२ पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदांपैकी सरळसेवेने भरती करावयाची १००१ इतकी पदे रिक्त आहेत. यामध्ये विविध एकाकी पदे तसेच कनिष्ठ अभियंता, कनिष्ठ अभियंता सहाय्यक, अग्निशामक, आरोग्य, पाणीपुरवठा यासारख्या अत्यावश्यक सेवेतील वर्ग १ ते वर्ग ४ मधील पदांचा समावेश आहे. प्रशासकिय कामकाज सुरळीत व प्रभावीपणे राबविण्याकरींता तसेच नागरिकांना सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याने ही ३४० पदांची भरती करण्यात येत आहे. ही भरती प्रक्रिया शासन आदेशानुसार टीसीएस या कंपनीच्या मार्फत राबविण्यात येणार आहे. महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांच्या मार्गदर्शनाखाली त्याची तयारी सुरू केली आहे. सोलापूर महापालिकेच्या अत्यावश्यक सेवेतील एकूण ३४० पदे भरण्यात येणार आहेत. या ३४० कर्मचाऱ्यांच्या वेतनावर दरवर्षी एकूण १५ कोटी १५ लाख ४४ हजार ८५६ रुपये अधिक खर्च होणार आहे. २.०५ टक्के वेतन खर्च वाढणार आहे. सध्या सोलापूर महापालिकेचा आस्थापना खर्च ४१.३३ टक्के आहे. तो वाढून ४३.३८ टक्के होणार आहे.

### या पदांची होणार भरती कंसात संख्या अशी :

पर्यावरण संवर्धन अधिकारी (१) , मुख्य अग्निशामक अधिकारी/अधिक्षक अग्निशामक दल (१), पशु शल्य चिकीत्सक/ पशु वैद्यकीय अधिकारी(१), उद्यान अधिक्षक(१), क्रीडाधिकारी(१), जीवशास्त्रज्ञ(१), महिला व बालविकास अधिकारी(१), समाज विकास अधिकारी(१), कनिष्ठ अभियंता –आकिटेक्चर (१), कनिष्ठ अभियंता – आटोमोबाईल (१), कनिष्ठ अभियंता – विद्युत (५), कनिष्ठ अभियंता – स्थापत्य (%३), कनिष्ठ अभियंता– यांत्रिकी(२), सहाय्यक कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी (१), जनसंपर्क अधिकारी(१), नेटवर्क इंजिनिअर (१), सहाय्यक प्रयोगशाळा तंत्रज्ञ(१), फायर मोटार मेकॅनिक(१), सहाय्यक उद्यान अधिक्षक (१), केमिस्ट (२), लॅबटेक्निशियन(२), कनिष्ठ अभियंता सहाय्यक – स्थापत्य( ३०) , आरोग्य निरीक्षक (१५), स्टेनो टायपिस्ट (३), फिल्टर इन्पेक्टर (३), अनुरेखक – ट्रेसर (२), कनिष्ठ श्रेणी लिपीक (%०), मिडवाईफ (५०), पाईप फिटर व फिल्टर फिटर (१०), पंप ऑपरेटर (२०), फायरमन (३५), सुरक्षारक्षक (५) अशी एकूण ३४० पदांची भरती प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

## अक्कलकोट बाजार समिती

# सिद्रामप्पा पाटील यांचे नाव सभापतीपदासाठी निश्चित

✔ सुराज्य/सोलापूर

*अक्कलकोट कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती व उपसभापती पदाची निवड सोमवार दि.१५ मे रोजी होणार आहे. निवडणूक निर्णय अधिकारी अमर झालटे यांच्या अध्यक्षतेखाली दुपारी २ वाजता सभा होणार आहे. तसे पत्र सचिव एम.जी. बदोले यांनी काढून सर्व संचालकांना देण्यात आले आहे.*



सभापती पदासाठी माजी आमदार सिद्रामप्पा पाटील यांचे नाव निश्चित असून ते वयाच्या ८५ व्या वर्षी दुसऱ्यांदा पद भूषवून समितीचे कारभार हाकणार आहेत. तरी उपसभापतीसाठी जेष्ठ संचालक बसवराज माशाळे व माजी उपसभापती संचालक आप्पासाहेब पाटील यांच्यामध्ये रस्सीखेच सुरू झाली आहे. असे असले तरी आमदार सचिन कल्याणशेट्टी व सिद्रामप्पा पाटील यांनी काय निर्णय घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

कधी नव्हे यंदा अत्यंत चुरशीने बाजार समिती निवडून झाली. त्यामुळे सभापती, उपसभापती निवडीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. स्वामी समर्थ साखर कारखाना चेअरमनपदी संजीव पाटील यांची निवड झाल्याने माजी आमदार सिद्रामप्पा पाटील अक्कलकोट बाजार समिती सभापती होण्याचे दाट शक्यता निर्माण झाली आहे. उपसभापती पदी मात्र आडते व्यापारी मतदार संघातून निवडणूक आलेले बसवराज माशाळे व सोसायटी मतदार संघातुन निवडून आलेले अप्पाचे निष्ठावंत विश्वासू आप्पासाहेब पाटील हे सुद्धा दुसऱ्यांदा उपसभापती होण्यासाठी तीव्र इच्छुक आहेत.



मी माझ्या मुलाला निवडणूक रिंगणात उतरवणार होतो. मला नको म्हणून मी हट्ट धरला होता. त्यावेळी अप्पांनी मला जबरदस्तीने तुमची उमेदवारी राहू द्या, असे सांगितले. घटनेला काही व्यापारी साक्षीदार आहेत. मी उपसभापतीसाठी इच्छुक आहे. याबाबत सिद्रामप्पा पाटील योग्य निर्णय देतील

– **बसवराज माशाळे, संचालक**



मी स्वामी समर्थ सहकारी साखर कारखाना व्हा चेअरमन पदासाठी इच्छुक होतो. मात्र अप्पांनी तुमची अक्कलकोट बाजार समितीमध्ये विचार करता येईल, नाराज होऊ नका असे सांगताच मी माघार घेतली आहे.

– **आप्पासाहेब पाटील** ज्येष्ठ संचालक

## कर्नाटकात काँग्रेसला बहुमत

# ९ वर्षानंतर मंगळवेढ्या काँग्रेसने केला जल्लोष

✔ सुराज्य/मंगळवेढा

कर्नाटक विधानसभा निवडणुकीच्या निकालात काँग्रेस पक्षाने बहुमत मिळवल्याने मंगळवेढा काँग्रेसने तब्बल ९ वर्षानंतर विजयाचा जल्लोष गुलालाच्या उधळणीने साजरा केला.

येथील दामाजी चौकात हा जल्लोष साजरा करण्यात आला यावेळी दामाजी पंताच्या पुतळयास तालुका अध्यक्ष प्रशांत साळे व ॲड. नंदकुमार पवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष चंद्रशेखर कौडूभैरी, मतदारसंघ अध्यक्ष मारुती वाकडे, जिल्हा उपाध्यक्ष दादा पवार, जिल्हा सरचिटणीस दिलीप जाधव,पांडुरंग जावळे, ग्रामीण विकास तज्ञ दत्तात्रय खडतरे, अनु.जाती जमातीचे उपाध्यक्ष नाथा ऐवळे, तालुका सरचिटणीस आबा भोसले, समीर इनामदार, तसलीम अंकुजी,संदीप पवार मनोज माळी आदी उपस्थित होते

राष्ट्रवादीचा बालेकिल्ला असलेल्या या मंगळवेढ्याच्या मतदारसंघात आमदार राष्ट्रवादीचा तर खासदार काँग्रेसचा अशी परिस्थिती होती मात्र मतदार संघाची पुनर्रचना झाल्यानंतर हा मतदारसंघ २००९ च्या विधानसभेच्या निवडणुकीत रिडालोसने जिंकला.स्व.आ.भारत भालके यांनी २०१४ साली भारत भालके यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश करून केल्यानंतर काँग्रेसने ही जागा जिंकली होती. त्यावेळेला काँग्रेसने मंगळवेढ्यामध्ये मोठ्या प्रमाणात जल्लोष साजरा केला. त्यानंतर २०१९ ला भालके यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यानंतर ही जागा राष्ट्रवादीकडे गेली. भले राज्यात सरकार आले. असले तरी काँग्रेसला स्वतंत्र जल्लोष करता आला नव्हता मात्र कर्नाटक झालेल्या कर्नाटक विधानसभेच्या मतदानाच्या मतमोजणीनंतर काँग्रेस पक्षाने जवळपास १३५ जागा जिंकल्याचा आनंदात मंगळवेढा काँग्रेस कमिटीच्या वतीने हा जल्लोष मंगळा साजरा करण्यात आला.

खासदार राहुल गांधी यांच्या भारत जोडो यात्रेला कर्नाटकात चांगला प्रतिसाद मिळाला होता. त्याचा फायदा काँग्रेसला सत्ता स्थापन करण्यापर्यंत झाला शिवाय प्रचाराच्या रणधुमाळीमध्ये काँग्रेसने धार्मिक मुद्दे उपस्थित न करता विकासाचे व सर्वसामान्य जनतेचे प्रश्न उपस्थित करून मतदाराचे मन वळविण्यात यशस्वी ठरल्याने काँग्रेसला सत्तेपर्यंत जाता आल्याची प्रतिक्रिया नंदकुमार पवार यांनी दिली. कर्नाटकातील विजय हा काँग्रेसला लोकसभा निवडणुकीसाठी संजीवनी देणारा ठरला आहे भविष्यात काँग्रेस देशात व राज्यात चांगल्या पद्धतीने राहुल गांधी प्रियांका गांधी व अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या नेतृत्वाखाली वाटचाल करेल असा विश्वास तालुकाध्यक्ष प्रशांत साळे यांनी व्यक्त केला.




## पिलीव-अकलूज रस्त्याची एक वर्षातच दुरावस्था

✔ **पिलीव :** माळशिरस तालुक्यातील पिलीव - अकलुज ( निमगाव ) मार्गे जाणाऱ्या रस्त्याचे काम होऊनही जेमतेम एक वर्ष होतेय तोपर्यंतच या रस्त्यावर प्रचंड मोठ मोठे खड्डे पडले आहेत. याविषयी अकलुज येथील सार्वजनिक बांधकाम विभागाकडे अनेक वेळा तक्रारी केल्या तरींही बांधकाम विभागाने याची कसल्याही प्रकारची दखल घेतली नाही. साखर कारखान्याचा गळीत हंगाम बंद झाल्यानंतर आम्ही या रस्त्याचे काम करणार आहे असे सांगितले जात होते. पण सध्या गळीत हंगाम बंद होऊन दोन - तिन महिने झाले तरींही बांधकाम विभागाने या रस्त्यावर पडलेले खड्डे बुजविणयाची तसदी घेतली नाही. या रस्त्याचे झिंजेवस्ती गावच्या हद्दीत अतिशय निक्रष्ट दर्जाचे काम केले आहे. यावेळी साईड पट्टी, साईड गटार न करताच बांधकाम विभागाने ठेकेदाराला संपूर्ण बिल अदा केले आहे. पावसाळ्यापुर्वी सदर रस्तावरील खडडे ताबडतोब बुजविणयाची मागणी नागरिकांमधून होत आहे.

# उजनी उजवा कालवा गळती प्रकरणी दोषी अधिकाऱ्यावर कारवाई करा

✔ सुराज्य/अकलूज



## युवा सेनेची मागणी

उजनी धरणावरील संगम येथील उजवा कालव्याला ३० एप्रिल रोजी गळती लागली होती . संबधित दोषी अधिकाऱ्यांना तत्काळ निलंबित करावे अशी मागणी युवा सेना जिल्हा प्रमुख गणेश इंगळे व शिवसेना तालुका प्रमुख संतोष राऊत यांनी जिल्हा अधिकारी शंभरकर यांच्या कडे केली आहे, अशा आशयाचे निवेदन नायब तहसीलदार श्रीमती स्मिता गायकवाड यांनी स्विकारले.

यावेळी युवा सेना जिल्हा समन्वयक पप्पू तांबोळी युवा सेना उपतालुका प्रमुख प्रणित पवार युवा सेना उपतालुका प्रमुख समाधान गोरे शिवसैनिक मिलिंद मोरे उपस्थित होते ३० एप्रिल रोजी सायंकाळी ७ वाजता उजनी धरणावरील उजवा कालवा संगम येथे भिमा नदीवर गळती चालू झाली होती. उजनी उजव्या कालव्याची रबर तुटल्याने लाखो लिटर पाणी वाया जात होते. त्यामुळे तत्काळ संबधित उपविभागीय अधिकारी कल्याणराव माने देशमुख यांना संपर्क साधला असता ते कॉल उचलत नव्हते. १८ तास उलटून गेले तरी माने देशमुख घटना स्थळी फिरकले नाहीत. उन्हाळयामुळे शेतकऱ्यांची पिके होरपळून गेली. उजनीची पाण्याची पातळी मायनस मध्ये असताना असा निष्काळजीपणा केल्यामुळे दोषी अधिकारी आहेत त्यांना निलंबित करावे अशी मागणी करण्यात आली आहे.

## अवकाळी पावसाने मंगळवेढ्यातील शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान

✔ सुराज्य/मंगळवेढा

अवकाळी वादळासह झालेल्या पावसात ग्रामीण भागात शेतकऱ्यांच्या घराचे,फळ पिकाचे,जनावराचे नुकसान झाले आहे.शुक्रवारी सायंकाळी पाचच्या दरम्यान आलेल्या वादळामुळे भाळवणी येथे दोन घराचे पत्रे उडाले तर अंकुश सावंजी यांच्या डाळिंब तर चंद्रकांत मोरे यांच्या मका पिकाचे नुकसान झाले,खोमनाळ येथे संभाजी कोडग यांच्या पपई पिकाचे नुकसान झाले. जालीहाळ येथे आसंत जावीर यांच्या घराचे तर विष्णू भंडगे यांच्या आंबा पिकाचे नुकसान झाले.

आंधळा मुळे अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडले तर वीज पुरवठा ग्रामीण भागात खंडित झाला महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी रात्री उशिरापर्यंत वीजपुरवठा सुरळीत करण्याचे प्रयत्न सुरू होते. नंदेश्वर येथे वीज पडल्यामुळे सिध्देश्वर नामदेव गरंडे याची चार गायी दगावल्या. त्यामुळे या कुटुंबाचे साधन आपत्तीत संपल्यामुळे कुटुंबीय आर्थिक अडचणीत आले सध्याच्या काळात शेतीमध्ये उत्पादित खर्च पिकांसाठी उत्पादनासाठी लागणारा खर्च मोठ्या प्रमाणात असताना मिळणारे उत्पादन तुकडे असल्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत आला असतानाच वादळामुळे उभ्या पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान केले. त्यामुळे आणखीनच शेतकरी अडचणीत आला गतवर्षी परतीचे पावसाने केलेल्या नुकसानी देखील शासनाने ठराविक मंडल मधील शेतकऱ्याला नुकसान भरपाई देऊन शेतकऱ्याप्रती सवती वागणूक देण्याचा प्रयत्न केला.या नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्याची मागणी होत आहे. गत आठवड्यामध्ये लक्ष्मी दहिवडी, गुंजेगाव, मारापुर, सलगर लवंगी भागात देखील नुकसान केले.

## अक्कलकोट एस.टी.स्टँडमधून दीड तोळ्याचे सोने लंपास

✔ **अक्कलकोट :** अक्कलकोट एस.टी. स्टँड परिसर येथुन अज्ञात इसमाने एका सेवानिवृत्त लिपीकाचे ४५ हजार रूपयाचे एक दीड तोळयाचे सोन्याचे लॉकेट व बदाम चोरुन नेला. याची फिर्याद महादेव गुरूनिंगप्पा दिकसंगी (वय ५९ वर्षे) सोलापूर यांनी दिली. ९ मे रोजी नातेवाईकांचे अफजलपुर येथे लग्नकार्य साठी सोलापुर येथून सकाळी ९ वा. एस.टी.बस मध्ये बसुन सकाळी १० वा. अक्कलकोट येथे आलो. त्यानंतर अक्कलकोट ते अफजलपुर बसची वाट बघत असताना सव्वादहा वाजण्याच्या सुमारास गर्दीचा फायदा घेऊन गळयात हात घालुन सोन्याचे लॉकेट चोरले. अज्ञात चोरट्याविरुध्द गुरूवारी फिर्याद उत्तर पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल झाला.अधिक तपास पोलीस करत आहेत.

# जिल्हा कारागृहात मानसिक आरोग्य जनजागृती

## मानसोपचार तज्ञ डॉ.हर्षल थडसरे यांचे मार्गदर्शन

✔ सुराज्य/सोलापूर

गुरुवारी जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम,जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय, सोलापूर यांच्यावतीने ''स्वस्थ तन स्वस्थ मन'' या मोहिमअंतर्गत जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. डी.के.पाटील,निवासी वैद्यकीय अधिकारी मा.डॉ श्रीकांत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा कारागृह सोलापूर येथे बंदी पुरुष व महिला साठी मानसिक आरोग्य जनजागृती व तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमात सुरवातीला कारागृह अधीक्षक हरीभाऊ मिंड यांनी कार्यक्रमाची माहिती दिली व प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले.पुढे मानसोपचार तज्ञ डॉ हर्षल थडसरे यांनी मानसिक आजार म्हणजे काय ? ते कसे ओळखावे ? त्याची लक्षणे , उपचार यासोबतच मानसिक आजाराविषयीचे गैरसमज याबद्दल उपस्थितांना मार्गदर्शन केले.आत्महत्या त्याची कारणे व प्रतिबंध शिवाय व्यसन म्हणजे मानसिक आजार याविषयी विस्तृत चर्चा केली.

कार्यक्रमानंतर उपस्थित बंदी लोकांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देताना ताणतणावाचे व्यवस्थापन याविषयी मार्गदर्शन केले.शेवटी बंदी पैकी जवळपास २० लोकांना वैयक्तिक समुपदेशन व औषधोपचार केले गेले.

याशिवाय सर्व पुरुष व महिला बंदी यांचे मध्ये क्षय रोग विषयक लक्षणे यांची माहिती देवून,आजारविषयक गैरसमज,निदान व उपचार सुविधा व मानसिक स्वास्थ्य कायम राखणे विषय आदि बाबीची सखोल चर्चा करण्यात आली. या प्रसंगी कारागृहाचे अधीक्षक हरीभाऊ मिंड,बाबर व इतर कारागृह कर्मचारी उपस्थित होते.या सर्व कार्यक्रमाचे नियोजन अतुल राऊत यांनी केले.



## श्रीहरी भाकरे यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान

✔ **सांगोला :** मंथन वेल्फेअर फाउंडेशनच्या वतीने घेण्यात आलेल्या मंथन राज्यस्तरीय सामान्य ज्ञान परीक्षेत सांगोल्यातील श्रीहरी भाकरे याने राज्यात सहावा क्रमांक पटकावला. यानिमित्त त्यांचा सत्कार करण्यात आला. नुकताच अहमदनगर येथे झालेल्या शानदार सोहळ्यात मंथन परीक्षेतील राज्यस्तरीय गुणवत्ता यादीत स्थान मिळवलेल्या गुणवंतांचा सन्मान करण्यात आला.या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी माजी शिक्षण आयुक्त डॉ. पुरुषोत्तम भापकर होते. व्यासपीठावर सिनेअभिनेत्री डॉ. निशिगंधा वाड,साहित्यिक डॉ.संजय कळमकर,डॉ.वैभव अजमरे,डॉ.अशोक जोगदे उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते श्रीहरी भाकरे याचा सन्मान करण्यात आला. यावेळी पालक दिपक भाकरे व पुनम भाकरे उपस्थित होते. श्रीहरी भाकरे हा उत्कर्ष प्राथमिक विद्यालय सांगोला येथे इयत्ता पहिलीमध्ये शिकत आहे.

# चिखली गावात पाणी टंचाई; टँकर सुरू करण्याची मागणी

✔ सुराज्य/चिखली

मोहोळ तालुक्याच्या चिखली गावातील परिसरात ग्रामपंचायतीच्या मालकी हक्काच्या विहिरी, बोअरवेल यांनी तळ गाठल्याने हंडाभर पिण्याच्या पाण्यासाठी गावकऱ्यांना दारोदार भटकंती करावी लागत आहे. यासाठी पिण्याच्या पाण्याचे टँकर सुरू करण्याची मागणी गटविकास अधिकारी यांच्या कडे महिन्यांपूर्वी केली आहे. अद्याप टँकर सुरू न झाल्याने संतप्त गावकऱ्यासह महिला वर्गाने आता आंदोलनाचा इशारा दिला आहे .

मोहोळ तालुक्यातील चिखली येथे पाण्याची पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. गावातील महिलांना पाण्यासाठी इतरत्र वणवण दूरवर भटकत फिरावे लागत आहे. विशेषत: गावात राहणाऱ्या नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न जटील बनला आहे. गावांसाठी पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरी, बोअरवेल, हातपंप यांना पाणी राहिले नसल्याने गंभीर परिस्थिती उद्भवली आहे. चिखली ग्रामपंचायतीने टँकर सुरू करावा,असा प्रस्ताव मोहोळ पंचायत समितीकडे देऊन तब्बल महिना उलटला आहे. मात्र तरीही प्रशासनाकडून पाण्याचा टँकर सुरू करण्याबाबत कोणत्याही हालचाली दिसून येत नाहीत. यामुळे दिवसेंदिवस शासनाप्रती नागरिकांचा रोष वाढत आहे. टँकर सुरू झाला नाही तर ग्रामपंचायत कार्यालयासमोर घागर मोर्चा काढण्याचा सनसनाटी इशारा आता महिला वर्गाने दिला आहे . याकडे संबंधित विभागातील अधिकारी यांनी तातडीने लक्ष केंद्रित करून सदरचा प्रश्न त्वरित मार्गी लावावा अशी जोरदार मागणी चिखली गावातील नागरिकांतून करण्यात येत आहे .

# माऊली शिक्षण संस्थेत 'संस्कार व्यक्तिमत्व विकास शिबिराची' सांगता


✔ सुराज्य/टेंभुर्णी



श्री माऊली शिक्षण प्रसारक व समाजसेवा मंडळाच्यावतीने आयोजित समर कॅम्पच्या समारोपाप्रसंगी राजमाता जिजाऊ व ज्ञानजोती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष योगेश बोबडे, सचिवा सूरजा बोबडे, अमोल मस्के, बालाजी पाटील, औदुंबर महाडीक, पै.दयानंद महाडीक, प्रसाद मोरे, समन्वयक विकास करळे सर, उपप्राचार्या सौ.रेखा सुरवसे मॅडम व जनसंपर्क अधिकारी सागर खुळे सर व इतर मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमात मुलांनी स्वत: संगीताच्या तालावर अतिथींचे स्वागत गीताने मन जिंकले. त्यानंतर लाठीकाठी सारख्या मर्दानी खेळाचे सादरीकरण केले. आर्ट व क्राफ्ट मधून विविध वस्तू तयार करणे, फेटा बांधणे, सर्पज्ञानाची सखोल माहिती, रोप क्लाइंबिंग, बेसबॉल, सर्वांग सुंदर व्यायाम, विद्यार्थी मनोगत, स्वरधारा या व अशा अनेक विविध कलाप्रकार सादर केले. मुलांना अभ्यासासोबतच विविध कौशल्यपूर्ण उपक्रम संस्थेत राबविले जातात व अधिकारीही घडविणारी शाळा म्हणून या संस्थेकडे पाहिले जाईल असे मत संस्थेचे अध्यक्ष योगेश बोबडे यांनी मत व्यक्त केले.

मेळाव्याचे सूत्रसंचालन अडाणे, प्रास्ताविक संतोष नरुटे सर तर आभार अनुष्का सरडे या विद्यार्थिनीने केले. हा कार्यक्रम संपन्न होण्यासाठी संस्थेतील प्रशिक्षक,सर्व शिक्षक व शिक्षिकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले. यावेळी पालकवर्गही मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांचे क्रीडा स्पर्धेत यश

✔ **पंढरपूर :** इंडियन सोसायटी फॉर टेक्निकल एज्युकेशन' व इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअर्स' यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापूर मधील नेहरूनगर येथील शारीरिक शिक्षण महाविद्यालयात 'डिप्लोमा युथ फेस्टिवल' चे आयोजन करण्यात आले होते. या युथ फेस्टिवल मध्ये सोलापूर जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांनी सहभाग घेतला होता. या उपक्रमांतर्गत झालेल्या विविध स्पर्धांमध्ये स्वेरी संचालित फार्मसी महाविद्यालयाने यश संपादन केले.

यामधील कॅरम (डबल) या प्रकारात स्वेरी फार्मसी महाविद्यालयाच्या तृतीय वर्षात शिक्षण घेणाऱ्या पार्थ रावल आणि सुरज पवार यांनी प्रथम क्रमांक मिळविला. या दोन्ही विद्यार्थ्यांना क्रीडा विभागाचे प्रमुख प्रा.वैभव गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले. या त्यांचे स्वेरीचे संस्थापक सचिव डॉ. बी.पी.रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख, संस्थेचे इतर विश्वस्त व पदाधिकारी, स्वेरी फार्मसीचे प्राचार्य डॉ. मिथुन मणियार आदींनी अभिनंदन केले.

# अक्कलकोट तालुक्यात खरीप पेरणी पूर्व मशागतीच्या कामाला वेग

✔ सुराज्य/अक्कलकोट

तालुक्यात सध्या खरीप पेरणी पूर्व मशागतीच्या कामाला वेग आला आहे.तालुक्यात वरुणराजाचा अगमान होताच खरीपाच्या पेरणीसाठी शेतकऱ्यांची लगबग सुरु होते. म्हणून अनेक शेतकरी आताच खरीप पेरणी पूर्व मशागतीची कामे अटोपताना दिसून येत आहेत.

तीव्र उन्हाचे चटके सहन करीत बळीराजा आपल्या जमिनीची मशागत करताना दिसतात.यंदा मशागतीसाठी बैल जोडी पेक्षा शेतकरी ट्रॅक्टरलाच अधिक पसंती देताना दिसतात.गथवर्षी अतिरिक्त पावसामुळे शेतकऱ्यांना खरीप हंगामात मोठा नुकसान सहन करावा लागला होता.त्यातच रोगराई व बदलत्या हवामानाचा परिणाम होऊन खरीप उत्पादनात अधिक घट आला होता.सध्या लग्न मुहूर्ताचे दिवस असताना ही बहुसंख्य शेतकरी आपल्या मुला-मुलींच्या लगीन घाईतच शेती मशागतीची कामे उरकताना दिसत आहेत. शेतकरी खरीप हंगामात लागणार्या औजारांची जुळवाजुळव सुताराकडे जाऊन



करताना दिसतात.यंदा मान्सूनचा अंदाज अजून प्रसिध्द झालेला नसताना ही अनेक शेतकरी खरीप हंगामाच्या तयारीसाठी लागले आहेत. तालुक्यात खरिपा बरोबरच रब्बी पिके ही मोठ्याप्रमाणात घेतात. परंतु मागच्या दोन वर्षांपासून अतिरिक्त पावसाचा फटका रब्बी पिकांना बसत आहे.अतिवृष्टी मुळे खरीप पिक वाया जात असल्याने पाऊस-पाणी होऊन ही या भागातील शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे.

### खरीप क्षेत्र मोठ्याप्रमाणात घटण्याची शक्यता

यंदा खरीप क्षेत्र मोठ्याप्रमाणात घटण्याची शक्यता आहे.या भागातील बहुसंख्य शेतकरी उस शेतीकडे वळताना दिसतात.गेल्या दोन– तीन वर्षांपासून तालुक्यात हरभरा ,उडीद ,मूग बरोबरच आता सोयाबीन कडे शेतकर्यांचा अधिक कल पहायला मिळत आहे.गथवर्षी अतिवृष्टीमुळे खरीप हंगाम वाया गेला होता.आता शेतकऱ्यांना आगामी हंगामाची चिंता लागली आहे.यंदा तरी खरीप हंगाम यशस्वी व्हावा यासाठी शेतकरी वरुणराजाकडे कृपादृष्टी मागताना दिसतात.शेतकरी पुन्हा एकदा भुतकाळ विसरुन भविष्य काळाच वेध घेत आगामी खरीप हंगामाची जोमात तयारी करताना दिसतात.

## मृत्यूस कारणीभूत; दुचाकी चालकावर गुन्हा

✔ सुराज्य/सोलापूर

गुरूनानक चौकाकडून घरी जात असताना दोन नंबर एसटी स्टॅन्ड येथे रस्ता ओलांडताना दुचाकीची धडक बसल्याने संजय कलादगी (वय ४२, रा. शास्त्री नगर) यांचा मृत्यू झाला.याप्रकरणी संगीता संजय कलादगी (वय-३५,रा.शास्त्री नगर) यांच्या फिर्यादीवरून दुचाकी चालकावर सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. संजय हे ९ मे रोजी रात्री दोन नंबर एसटी स्थानक परिसरात रस्ता ओलांडताना एका दुचाकी स्वाराने हायगयीने दुचाकी चालवत त्यांना जोरात ठोकरले.यात मार लागून संजय गंभीर जखमी झाले पुढील तपास वाघमोडे करत आहेत.

# भाजपचं कुठे चुकलं?

**हिमाचल प्रदेश प्रमाणे भाजपला सलग दुसऱ्यांदा सत्ता मिळवता आली नाही. बसवराज बोम्मई यांना दुसऱ्यांदा मुख्यमंत्रीपदी बसवण्यात नरेंद्र मोदींना ही शक्य झाले नाही. या निवडणुकीत मोदींनी एकट्याने दिशा बदलण्याचा प्रयत्न केला पण काँग्रेसच्या रणनितीसमोर ते अपयशी ठरले.**

सुराज्य/बेंगलुरु

कर्नाटकमध्ये एग्जिट पोलने वर्तवलेल्या अंदाजानुसार निकाल आले आहे. बजरंगबलीच्या जोरावर सत्ता पुन्हा मिळवण्याच्या भाजपच्या मनसुब्यांना धक्का बसला. कर्नाटक विधानसभेच्या निकालावरून एक गोष्ट स्पष्ट झाली की, ऐन महत्त्वाच्या वेळी महत्त्वाच्या मुद्द्यांवरून अन्य मुद्दे हाती घेतले तर त्यांचा अधिक काळासाठी फायदा होत नाही. ही गोष्ट कर्नाटकच्या निकालावरून क्लिअर कट झाली आहे. काँग्रेसने निवडणुकीतील रणनिती योग्य ठेवली. सुरुवातीपासून शेतकऱ्यांचे प्रश्न उपस्थित केले.

बसवराज बोम्मई यांच्या सरकारच्या त्रूटींवर फोकस केले. भारतीय जनता पक्षाला दोन मुख्यमंत्री बदलावे लागले, यामागील भ्रष्टाचाराचा मुद्दा काँग्रेसने लावून धरला. मजबूत असलेल्या लिंगायत समाजाचे नेते बीएस




येडियुरप्पा यांच्यावर लागलेले भ्रष्टाचाराचे डाग भाजपला पुसता आले नाहीत आणि काँग्रेसने हाच मुद्दा उचलून धरला. दुसऱ्या बाजूला ज्येष्ठ अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी डीके शिवकुमार, प्रियंका गांधी आणि राहुल गांधी यांनासह मिळून पाच अशी अश्वासने दिली ज्याचा थेट प्रभाव कर्नाटक विधानसभेच्या निकालावर दिसून येत आहे. अखिलेश यादव यांनी नुकतेच जे ट्विट केले आहे. ते म्हणतात, कर्नाटकचा निकाल हा संदेश आहे की, भाजपची नकारात्मकता, धार्मिकता, भ्रष्टाचारी, महिला-युवक विरोधी, समाजिक मतभेद, खोटा प्रचार, व्यक्तीवाद राजकारणाचा अंत काळ सुरू झाला आहे.

अखिलेश यादव यांचे सर्व मुद्द जरी मान्य होणारे नसले तरी राजकारणात धर्माचा वापर करून विजयाची हमी आहे का? आणि व्यक्तीकेंद्रीय राजकारणाची एक्सपायरी डेट असते की नाही?ज्या प्रकारे हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री सुखविंदर सिंह सुक्खू हे कर्नाटकच्या प्रचारात उपस्थित होते आणि छत्तीसगडचे मुख्यमंत्री भूपेश बघेल प्रचारात होते. त्यावरून भाजपची रणनिती लाभार्थींना टार्गेट करण्याची रणनिती होती. पण त्याला सुरुंग लावण्यात काँग्रेसला यश आले. या निकालात जुनी पेन्शन स्कीम हा सर्वात मोठा फॅक्टर राहिला. दुसरा मुद्दा युवक आणि बेरोजगारांसाठी काँग्रेसने जी आश्वासने दिली. स्वत: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अनेक सभेत म्हटले होते की, काँग्रेसचे जे राजकारण आहे की आम्ही ३ हजार रुपये देऊ, २ हजार रुपये देऊ हे योग्य नाही. काही वर्षांपूर्वी पंतप्रधानांनी मनरेगाला काँग्रेसच्या अपयशाचे स्मारक असल्याचे सांगितले होते. भाजपला असे वाटते होते की, ज्या भाजपच्या जन कल्याणाच्या योजना आहेत त्या चांगल्या आहेत आणि काँग्रेसच्या योजना या चांगल्या नाहीत. मात्र ही रणनिती काँग्रेसने स्विकारली.

याचा फायदा त्यांना हिमाचल आणि आता कर्नाटकमध्ये झाला. मात्र उत्तर प्रदेशमध्ये त्यांना याचा फायदा झाला नाही. अर्थात तेथील कारणे वेगळी होती.आतापर्यंत कर्नाटकमधील भाजपच्या पराभवाचे मुख्य कारण ठरले ते त्यांचे भ्रष्टाचार होय. भाजपची ओळख ही गुड गव्हर्नेंस अशी आहे. पण ज्या पद्धतीने मुख्यमंत्री बदलले, ऑडियो टेप बाहेर आले, आत्महत्याचे प्रयत्न झाले आणि यात सरकारमधील लोक आणि त्यांच्या नातेवाईकांचा समावेश होता. त्यानंतर ४० टक्के कमिशनचे जे प्रकरण होते त्याने काँग्रेसला यश मिळून दिले.राज्यात जेडीएस अधिक कमकूवत दिसली, ज्याचा फायदा काँग्रेसला झाला. विशेषत: ओल्ड म्हैसूर भागात येथे वोक्कलिंगा समाज एडी कुमारस्वामी आणि त्यांच्या वडिलांना मतदान करतो. पण या भागात काँग्रेसने उडी मारली.

पंजाबमधील दोन निवडणुकीत आप आदमी पक्षाने काँग्रेसला बाजूला केले तसेच या निवडणुकीत जेडीएसचा बालेकिल्ला असलेल्या भागात भाजपला भरपाई करता आली नाही. या भागात काँग्रेस मजबूत होताना दिसते. कोस्टर कर्नाटकमध्ये भाजपची कामगिरी चांगली झाली आहे. बेंगळुरूमध्ये बरी कामगिरी केली तरी देखी भाजपचा पराभव झाला. कर्नाटकात प्रादेशिक राजकारणाचा प्रभाव दिसतोय. एकूणच काँग्रेसने शानदार कामगिरी केली.

# कर्नाटकमध्ये काँग्रेसला विजय मिळवून देणारे ४ चाणक्य कोण? पडद्यामागे राहून मारली बाजी

## कर्नाटक विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचा मोठा विजय; भाजपला मोठा धक्का

सुराज्य/कर्नाटक

**कर्नाटकमध्ये विधानसभा निवडणुकीचे निकाल पाहता काँग्रेस पुन्हा सत्तेत परत असल्याचं आता स्पष्ट झालं आहे. सत्ताधारी भाजपचा निवडणुकीत दारूण पराभव होताना दिसतोय. काँग्रेसने मागील निवडणुकी प्रमाणे बेसावध न राहता पूर्णनियोजन आखत आणि खबरदारी घेऊन पावलं टाकली. फक्त निवडणुकीतच नाही तर आता निवडणुकीच्या निकालनंतरही काँग्रेस पूर्णपणे सावध आहे. यामुळे भाजपला कुठलीही संधी मिळण्याची शक्यता कमीच आहे. काँग्रेसच्या या विजयामागे पक्षाचे चार चाणक्य असल्याचे बोलले जात आहे. ज्यांनी भाजपच्या हातून सत्ता खेचून आणली आहे. पाहूया कोण आहेत ते चार चाणक्य...**





एम.बी.पाटील | शशिकांत मेंथील | सुनील कानुगोल | जी परमेश्वर

### एम. बी. पाटील

कर्नाटक काँग्रेसमधील लिंगात समाजाचा एक मोठा चेहरा म्हणून बघितलं जातं. काँग्रेस धारदार निवडणूक रणनितीमागे एम. बी. पाटील यांची मोठी भूमिका आहे. काँग्रेसच्या प्रचार समितीचे एम. बी. पाटील हे अध्यक्ष आहेत. काँग्रेसने यावेळी स्थानिक मुद्द्यांसह घरोघरी प्रचारावर अधिक भर दिला. यामागेही पाटील यांचाच विचार असल्याचं सांगण्यात येतंय. यामुळेच चार वर्षांनंतर सोनिया गांधी यांनी कुठलीही प्रचार सभा घेतली नाही. पाच वेळा आमदार आणि कुमारस्वामी सरकारमध्ये गृहमंत्री राहिलेले एम. बी. पाटील यांच्याकडे मिशन शेट्टार हे सोपवण्यात आले होते. जगदीश शेट्टार यांना काँग्रेसमध्ये आणण्यामागे त्यांची मोठी भूमिका असल्याचं बोललं जातंय. कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सिद्धारामय्या यांचे निवकटवर्तीय म्हणून ओळखले जाणारे पाटील यांचे वडील बी. एम. पाटील हे मोठे राजकीय नेते होते.

### शशिकांत सेंथिल

काँग्रेसमध्ये येण्यापूर्वी आयएएस अधिकारी होते. २००९ मध्ये कर्नाटक कॅडरचे आएएस असलेल्या सेंथिल यांनी या निवडणुकीत काँग्रेसच्या वॉररूमचे प्रभारी म्हणून मोठी भूमिका बजावली. २०१९ त्यांनी आयएएसच्या नोकरीचा राजीनामा दिला. २०२० मध्ये काँग्रेसमध्ये प्रवेश केला. जुलै २०२२ मध्ये त्यांच्याकडे वॉररूमची जबाबदारी देण्यात आली. निवडणुकीच्या काळात वॉररूममध्ये प्रत्येक जागेचा आढावा घेण्यात आला आणि बड्या नेत्यांना त्याचा रिपोर्ट सादर करण्यात आला.

### सुनिल कानुगोल

यांना डेटा अनालिसिसचं तज्ज्ञ समजलं जातं. कानुगोलू हे २०२२ पासून कर्नाटक काँग्रेसच्या रणनितीकारांपैकी एक आहेत. प्रचार, सर्वे आणि उमेदवारांच्या निवडीबाबत कानुगोलू यांनी रणनिती आखली होती. कर्नाटकच्या बेल्लारी येथील राहणाऱ्या कानुगोलू यांनी अमेरिकेत एमबीएचं शिक्षण घेतलं आहे. २००९ मध्ये ते मायदेशात परतले. प्रशांत किशोर यांच्या टीममध्ये (सिटिजन फॉर अकाउंटेबल गव्हर्नन्स) होते. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत नरेंद्र मोदी यांच्या मोहीमेशी संबंधित एका टीममध्ये होते. २०१७ मध्ये उत्तर प्रदेशात भाजपची रणनिती आखण्यातही कानुगोलू यांची भूमिका होती. २०२२ मध्ये अकाला दलसाठीही त्यांनी काम केलं आहे. कर्नाटकबाबत प्रशांत किशोर यांच्याशी सूत न जुळल्याने काँग्रेसने कानुगोलू यांच्याशी संपर्क केला. राज्यात ४० टक्क्यांची (भ्रष्ट ) सरकार, पे-सीएम आणि रेट कार्ड सारख्या मोहीमेमागे कानुगोलू यांचंच डोकं असल्याचं बोललं जातंय. जाहीरनाम्यासाठीही त्यांची मदत घेण्यात आली. काँग्रेस मध्य प्रदेशचीही जबाबदारी सोपवली आहे. यासह लोकसभा निवडणुकीसाठी रणनिती आखणाऱ्या काँग्रेस २०२४ च्या टास्क फोर्सचेही ते सदस्य आहेत.

### जी परमेश्वर

कर्नाटक काँग्रेसचा जाहीरनामा बनवण्यात जी परमेश्वर हा मोठा चेहरा असल्याचं मानलं जातं. या जाहीरनाम्यातील पाच आश्वासनं चर्चेत आहेत. पीएफआयसोबत बजरंग दलावर बंदी आणण्याचा उल्लेख जाहीरनाम्यात केल्याने काँग्रेस थोडी अडचणीत आली होती. पण ६२ पानांच्या जाहीरनाम्यातील इतर आश्वासनं काँग्रेसच्या बाजूने गेली. गृह ज्योती योजनेनुसार प्रत्येक महिन्याला २०० युनिट वीज मोफत, गृहलक्ष्मी योजनेनुसार कुटुंबातील प्रमुख महिलेला प्रत्येक महिलेला २ हजार रुपये मदत देणार. याशिवा. अन्न भाग्यच्या माध्यमातून द्रारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील प्रत्येक सदस्याला १० किलो तांदूळ देण्याचे आश्वासन. युवा निधीनसुरा बेरोजगार पदवीधरांना महिना ३ हजार रुपये देण्याचं आश्वासन. यासह पदविका (डिप्लोमा) धारकांना महिन्याला दीड हजार रुपये देण्यात येतील, असं अश्वासन काँग्रेसने दिलं. कर्नाटकमधील वेगवेगळ्या विभागांसाठी जाहीरनामाही तयार केला. १९८९ मध्ये पहिल्यांदा आमदार झालेले परमेश्वर हे कायम प्रसिद्धीपासून दूर राहतात.

## मोदींची जादू फेल, कर्नाटकात दारुण पराभव


# काँग्रेसच्या ऐतिहासिक विजयामागील ५ मोठी कारणे

सुराज्य/बेंगलुरु

**कर्नाटक विधानसभा निवडणुकीत भाजप आणि जेडीएसचा धुव्वा उडवत काँग्रेसने ऐतिहासिक विजय मिळवला आहे. विधानसभेच्या २२४ जागांपैकी तब्बल १३५ पेक्षा अधिक जागांवर आघाडी घेत काँग्रेसने कर्नाटकाची सत्ता काबीज केली आहे. सर्व जागांवरील अंतिम निकाल येणं अद्याप बाकी आहे. मात्र आता मतमोजणीच्या अनेक फेऱ्या पार पडल्या असल्याने या कलांमध्ये फारसा फरक पडणार नसल्याचं स्पष्ट आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेत्यांसह कार्यकर्त्यांनी फटाके फोडत विजयाचा जल्लोष करण्यास सुरुवात केली आहे. मात्र एकीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा चेहरा आणि कर्नाटकात बसवराज बोम्मई यांच्या नेतृत्वाखाली सरकार असताना काँग्रेसने भाजपच्या सत्तेला कसा सुरुंग लावला, याबाबत आता देशभरात चर्चा होऊ लागली आहे.**

### १. सोशल इंजिनियरिंग

भाजपकडून देशभरातील विविध निवडणुकांमध्ये विकासासोबत आक्रमक हिंदुत्वाचा अजेंडा केंद्रस्थानी आणला जातो. कर्नाटक विधानसभा निवडणूकही त्याला अपवाद नव्हती. काँग्रेसने आपल्या जाहीरनाम्यात सत्तेत आल्यानंतर बजरंग दलासारख्या संघटनांवर कारवाई करू, असं आश्वासन दिल्यानंतर भाजपने याविरोधात रान पेटवत हा मुद्दा हनुमानाशी जोडला. काँग्रेस हिंदूद्वेषी असल्यामुळेच बजरंग दलावर कारवाई करण्याची भूमिका घेत असल्याचं भाजपकडून सांगण्यात आलं. मात्र भाजपच्या या धार्मिक अजेंड्याला छेद देण्यासाठी काँग्रेसने विविध जातसमूहांना आपल्याकडे



खेचण्यासाठी रणनीती तयार केली. यामध्ये कर्नाटकात प्रभावशाली असणाऱ्या लिंगायत आणि वोक्कालिगा या जातींना आपल्या बाजूला आणण्यात काँग्रेसला यश आलं. अनेक लिंगायत नेत्यांनी निवडणुकीपूर्वी भाजपमधून काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. या पक्षांतराचा काँग्रेसला फायदा झाल्याचं दिसत आहे.

### २. पक्षांतर्गत गटबाजी टाळण्यात यश

राजस्थान आणि मध्य प्रदेशप्रमाणे कर्नाटकातही काँग्रेसमध्ये नेतृत्वासाठी रस्सीखेच होती. प्रदेशाध्यक्ष डी के शिवकुमार आणि माजी मुख्यमंत्री सिद्धारामय्या हे काँग्रेसचे तेथील दोन प्रमुख चेहरे आहेत. त्यामुळे मुख्यमंत्रिपदाच्या मुद्द्यावरून या दोन्ही नेत्यांमध्ये मतभेद होऊन त्याचे निवडणुकीतही परिणाम होतील, असं बोललं जात होतं. मात्र दोन्ही नेत्यांनी वैयक्तिक महत्त्वाकांक्षा बाजूला ठेवत पक्षाच्या विजयासाठी सर्व ताकद पणाला लावली. तिकीट वाटपातही काँग्रेसमध्ये एकमत झाला. या सर्वाचा परिणाम म्हणून राज्यातील संपूर्ण संघटना एकदिलाने लढली आणि भाजपच्या हातून सत्ता खेचून आणली व सत्ता मिळवली आहे.

### ३. सिद्धारामय्या यांचा करिष्मा

कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री राहिलेले सिद्धारामय्या हे जनमाणसांत प्रचंड लोकप्रिय असलेले नेते म्हणून ओळखले जातात. पाच वर्ष मुख्यमंत्रिपदी राहिल्याने आणि लोकांची अचूक नस माहिती असल्याने सिद्धारामय्या यांना तिथे प्रचंड जनाधार लाभला आहे. स्वच्छ प्रतिमेचा नेता अशीही त्यांची ओळख आहे. निवडणूक काळात सिद्धारामय्या यांनी भाजपने सत्ताकाळात प्रचंड भ्रष्टाचार केल्याचं सांगत प्रचाराचा धुरळा उडवून दिला. त्यामुळे काँग्रेसला याचा फायदा झाल्याचं निवडणूक निकालातून दिसत आहे.

### ४. अँटीइन्कम्बन्सीचा फायदा; काँग्रेसला यश

२०१८ साली झालेल्या निवडणुकीत कर्नाटकमध्ये त्रिशंकू स्थिती निर्माण झाली होती. त्यानंतर काँग्रेस आणि जेडीएस या पक्षांनी युती केल्याने सर्वात मोठा पक्ष ठरलेल्या भाजपला सत्तेपासून वंचित राहावं लागलं. मात्र नंतर राज्यात ऑपरेशन लोटस राबवण्यात आलं आणि काँग्रेसचे आमदार फोडत पुन्हा भाजपची सत्ता आली. मात्र भाजप सरकारच्या कामाविषयी जनतेत हळूहळू रोष वाढत गेला. हे सरकार प्रत्येक कामात ४० टक्के कमिशन घेत असल्याचा आरोप काँग्रेसकडून वारंवार करण्यात आला. तसंच धार्मिक राजकारण, बेरोजगारी, महागाई या मुद्द्यांवरून काँग्रेस बोम्मई सरकारला लक्ष्य केलं आणि सरकारविरोधात लोकांची नाराजी निर्माण होऊन त्याचं मतांमध्ये परिवर्तन करण्यात काँग्रेसला यश आलं.

### ५. राहुल गांधी यांच्या यात्रेचा परिणाम


काँग्रसचे नेते आणि पक्षाचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांनी काही महिन्यांपूर्वी कन्याकुमारी ते काश्मीर अशी देशव्यापी पदयात्रा सुरू केली होती. भारत जोडो यात्रा या नावाने निघालेली ही पदयात्रा कर्नाटकातूनही गेली होती. कर्नाटकात या यात्रेला तुफान प्रतिसाद मिळाला होता. सत्तेपासून दूर असलेल्या काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये या यात्रेमुळे उत्साह संचारला. तसंच भाजपला आपण टक्कर देऊ शकतो, असा आत्मविश्वासही काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये निर्माण करण्यात भारत जोडो यात्रेला यश आलं. आगामी काळात देखील याची जादू दिसणार आहे.

## खर्गेच मुख्यमंत्रीपदी?

सुराज्य/कर्नाटक

कर्नाटक विधानसभेत बहुमत मिळाल्यावर काँग्रेसमध्ये मुख्यमंत्रीपदावरून सिद्धरामय्या आणि डी. के. शिवकुमार यांच्यात लढत असली तरी आतापर्यंत मुख्यमंत्रीपदाने हुलकावणी दिलेले काँग्रेस पक्षाध्यक्ष मल्लीकार्जुन खरगे यांच्या नावावर सहमती होऊ शकते. तसे झाल्यास खरगे यांची मुख्यमंत्रीपदाची इच्छापूर्ती होऊ शकते.

कर्नाटक विधानसभेत विक्रमी नऊ वेळा निवडून आलेल्या खरगे यांना मुख्यमंत्रीपद कधीच मिळू शकले नाही. १९९९ मध्ये पक्षाला सत्ता मिळाली तेव्हा एस. एम. कृष्णा यांच्याकडे मुख्यमंत्रीपद सोपविण्यात आले. २००४ मध्ये काँग्रेस-जनता दल आघाडीचे धरमसिंह हे मुख्यमंत्री झाले. २०१३ मध्ये सत्ता मिळाली तेव्हा खरगे हे केंद्रात मंत्रिपदी होते. तेव्हा सिद्धरामय्या यांच्यावर पक्षाने जबाबदारी सोपविली होती. पक्षात आपण ज्येष्ठ असूनही मुख्यमंत्रीपदाने हुलकावणी दिल्याची सल खरगे यांच्या मनात कायम आहे. २०१४ ते २०१९ या काळात त्यांनी लोकसभेत काँग्रेस पक्षाचे गटनेतेपद भूषविले होते. २०१९च्या लोकसभा निवडणुकीत खरगे पराभूत झाले पण कालांतराने त्यांना राज्यसभेवर संधी देण्यात आली. राज्यसभेत निवडून आल्यावर खरगे यांच्याकडे विरोधी पक्षनेतेपद सोपविण्यात आले. पक्षाध्यक्षपदासाठी निवडणूक झाली तेव्हा अशोक गेहलोत यांनी ऐनवेळी नेतृत्वालाच आव्हान दिले. शेवटी खरगे यांना संधी देण्यात आली. मुख्यमंत्रीपदावरून सिद्धरामय्या आणि शिवकुमार यांच्यात प्रचाराच्या सुरुवातीला वाद झाला होता. शिवकुमार कधी मुख्यमंत्री होऊ शकणार नाहीत, असे विधान खरगे यांनी केले होते. तेव्हा सिद्धरामय्या यांच्यावर कुरघोडी करण्याकरिताच शिवकुमार यांनी खरगे यांच्याकडे मुख्यमंत्रीपद सोपवावे, अशी सूचना केली होती. काँग्रेस पक्षाला बहुमत मिळताच सिद्धरामय्या आणि शिवकुमार यांच्यात मुख्यमंत्रीपदावरून तीव्र स्पर्धा सुरू झाली आहे.



## जेडीएसमुळे काँग्रेसची मुसंडी, आमची मते शाबूत : फडणवीस

सुराज्य/सातारा

कर्नाटकात जनता दल सेक्युलर पक्षाची (जेडीएस) ५ टक्के मते कमी झाली आहेत. ही मते काँग्रेसकडे वळली आहेत. भाजपची मते शाबूत आहेत. भाजपच्या मतांवर काहीही परिणाम झालेला नाही, असा दावा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे.

कर्नाटक विधानसभा निवडणुकीच्या निकालात काँग्रेसला स्पष्ट बहुमत मिळणार असल्याचे संकेत आहेत. भाजपचा पराभव निश्चित झाला आहे. त्यावर प्रतिक्रिया देताना फडणवीस म्हणाले, २०१८ च्या निवडणुकीत काँग्रेसला ३८ टक्के मते होती. त्यावेळी जेडीएसला मिळालेल्या मतांपैकी पाच टक्के मते काँग्रेसकडे वळली आहेत. यामुळेच काँग्रेसची टक्केवारी वाढली आहे. २०१८ च्या कर्नाटका विधानसभा निवडणुकीत भाजपला जी मते मिळाली होती. तेवढीच मते आताच्या निवडणुकीतही मिळाली आहेत. आमच्या मतांवर काहीही परिणाम झालेला नाही. भाजपची मते शाबूत आहेत, असा दावा उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी कर्नाटक निवडणुकीसंदर्भात बोलताना केला.



# भाजपने तुरुंगात टाकले, दिल्लीत नेऊन एकटे पाडले, 'काँग्रेसचा चाणक्य' अख्ख्या भाजपला पुरुन उरला

सुराज्य/मुंबई

डीके शिवकुमार.. काँग्रेसचा असा नेता जो पक्षाच्या पडझडीच्या काळात प्रत्येक ठिकाणी खंबीरपणे उभा राहिला, भाजपला भिडला, तुरुंगवासही भोगला, पण २०२३ ची वाट पाहिली आणि सगळा हिशोब चुकता केला. कर्नाटक विधानसभेच्या निवडणुकीत डीके तब्बल १ लाख मतांनी विजयी झालेत. पक्षातून फुटलेल्या आमदारांना थेट मुंबईत येऊन धमकावणाऱ्या डीके शिवकुमार यांना २०१९ मध्ये तुरुंगात जावं लागलं, पण तुरुंगातून बाहेर आल्यानंतर शिवकुमार पेटून उठले आणि भाजपविरोधात रान पेटवलं..

आमदार फुटल्यानंतर पक्षाचा झालेला अपमान, तुरुंगात टाकल्याचा बदला आणि गावखेड्यातले मुद्दे पकडून भाजपचा हिशोब चुकता करणाऱ्या शिवकुमार यांची ही स्टोरीच... कर्नाटकातल्या भाजपच्या सभांमध्ये कधी द केरला स्टोरीची चर्चा झाली, तर कधी बजरंग दलाचा वाद समोर आला.. पण काँग्रेसने प्रत्येक सभांमध्ये एकच धडाका लावला आणि तो म्हणजे महागाई आणि बेरोजगारी.. डीके शिवकुमार यांनी प्रचाराची मोर्चेबांधणी केली, प्रत्येक सभेत स्थानिक मुद्द्यांना हात घालून भाजपला घेरलं आणि मतदानाच्या दिवशी जे केलं त्याने तर चित्र बदललं.. काँग्रेसने मतदानाच्या दिवशी बूथबाहेर गॅसचे सिलेंडर ठेवले आणि वाढलेले दर विसरू नका याची आठवण करून दिली.




### डीके शिवकुमार यांची राजकीय कारकीर्द

▶ १९९६ ला पंतप्रधान झालेल्या एच.डी. देवेगौडांचा ▶ १९८९ ला पराभव करून डीके शिवकुमार आमदार (सथानुर मतदारसंघ ) ▶ पहिल्यांदा आमदार असताना मंत्री, त्यानंतर ▶ झालेल्या प्रत्येक निवडणुकीत विजयी ▶ २०१८ ला काँग्रेस प्रदेशाध्यक्षपदी दुसऱ्यांदा डीके शिवकुमारांची निवड ▶ तर २०१९ मध्ये डीकेंना ईडीची नोटीस आली, दिल्लीत ५ दिवस कसून चौकशी ▶ चौकशीनंतर मनी लॉंड्रिंग आणि शेल कंपन्यांद्वारे परदेशात केलेल्या संशयित व्यवहारासाठी अटक ▶ चौकशी दरम्यान टाळाटाळ केल्याने अटक केल्याची ईडीची माहिती ▶ राजकीय वैमनस्यातून अटक केल्याची काँग्रेसचा आरोप ▶ पुढे, तुरुंगातून बाहेर आल्यावर डीकेंनी पक्षाची जबाबदारी साभाळली ▶ कर्नाटकात प्रभावशाली मानल्या जाणाऱ्या वोक्कालिंगा समाजाचं प्रतिनिधित्व ▶ अनेकदा वादाच्या भोवऱ्यात अडकवणारांना डीकेंचा धाडसी स्वभाव हिच त्यांची ओळख आहे.. २००२ ला महाराष्ट्रात विलासराव देशमुखांचं सरकार पाडण्याच्या हालचाली सुरू झाल्या..

हे सरकार वाचवण्यासाठी डीकेंची एंट्री झाली.. काँग्रेसच्या ४० आमदारांना महाराष्ट्रातून हलवलं आणि कर्नाटकात नेऊन स्वतःच्या रिसॉर्टमध्ये ठेवलं..

विलासरावांचं सरकार वाचवणाऱ्या डीकेंनी पुढे कर्नाटकात स्वतःचा दरारा तयार केला..

डीकेंकडे राजकारणात लागतं ते सगळं आहे... म्हणजे पैसा, लोकांमध्ये ताकद आणि नेत्यांशी निष्ठा हे असं सगळं.. प्रचंड श्रीमंत असणारा हा नेता राहुल गांधी आणि सोनिया गांधींचाही निष्ठावान म्हणून मानला जातो आणि त्यामुळेच कर्नाटकात काँग्रेसचा भावी मुख्यमंत्री म्हणून भाजपचा हिशोब चुकता करणाऱ्या डीकेंकडे पाहिलं जातंय..



Sunday Morning

सुराज्य सोलापूर



रविवार, दि. १४ मे २०२३

# वादळातही घोडदौड




''भारतीय अर्थव्यवस्थेत फिल्म इंडस्ट्रीचेही मोठे योगदान आहे. चित्रपटांच्या माध्यमातून सरकारला करमणूक कर मिळत असतो. शिवाय रोजगार देणारा उद्योग म्हणूनही या इंडस्ट्रीकडे पाहिले जाते. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अगदी दोन हजारच्या दशकांपर्यंत अनेक चित्रपटे गाजली. निर्मात्यांनी, कलावंतांनी, संगीतकरांनी मोठी कमाई केली. त्यानंतर या इंडस्ट्रीला थोडी मरगळ आली. आता धर्मावर आधारित चित्रपटांनी जोर धरला आहे. आपली घटना सर्वधर्म समभाव सांगते. कुठल्याही धर्माचा आदर झाला पाहिजे,अशी घटना सांगते.पण सत्तेच्या जोरावर आता धर्मावर आधारित चित्रपटांचा सुळसुळाट वाढत चालला आहे. वर्षापूर्वी द काश्मिर फाईल्स हा चित्रपट रिलीज झाल्यानंतर त्यावर मोठा वाद झाला. धर्मात आणि जातीत तेढ निर्माण करणारा हा चित्रपट आहे, अशी टीका झाली. गेल्या आठवड्यात द केरला स्टोरी हा चित्रपट दिमाखात रिलिज झाला पण त्यावरही वाद सुरू झाला आहे. नक्की काय आहे 'द केरळ स्टोरी'? हा सिनेमा त्या अहवालांवर आधारित आहे ज्यानुसार केरळमधील सुमारे ३२ हजार महिलांना बळजबरीने इस्लाममध्ये धर्मांतरित करण्यात आलं आणि अनेकांना इसिस अंतर्गत सीरियात नेण्यात आलं. सिनेमाचे निर्माते म्हणतात की हा सिनेमा सत्य घटनांवर आधारित आहे आणि त्यामुळे तो अनेक वादांनी घेरला आहे पण या वादळातही या सिनेमाची घोडदौड सुरू आहे. त्याविषयी हे विचारमंथन...




## केरळ स्टोरी चालण्याचे कारण?



केरळ स्टोरी सहाव्या दिवसांनंतरही बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई करत आहे. या सिनेमाच्या घवघवीत यशाचे एकमेव कारण म्हणजे द केरळ स्टोरी चित्रपटाचे कथानक. या चित्रपटाची कथा प्रेक्षकांना चित्रपटगृहांकडे खेचत आहे. शिवाय हिंदूविरुद्ध कटकारस्थानाचा सार या चित्रपटात मांडण्यात आला असल्यामुळे हा चित्रपट पहिल्यापासूनच चर्चेचा विषय बनला होता. याच चर्चेचा फायदा सिनेमाला होत आहे.

## १०० कोटींचा आकडा गाठणार...

'द केरला स्टोरी' या चित्रपटाची वादातही घोडदौड सुरू आहे. वादाच्या वादळातही  हा चित्रपट चित्रपटगृहांमध्ये खूप चांगली कामगिरी करतो आहे. हा चित्रपट लवकरच कमाईचा १०० कोटींचा आकडा गाठणार आहे. या चित्रपटाने पहिल्याच आठवड्यात मोठी कमाई केली. मीडिया रिपोर्ट्सनुसार, या चित्रपटाने प्रदर्शनाच्या सातव्या दिवशी १२ कोटींचा गल्ला जमवला. त्याआधी या चित्रपटाने पहिल्या दिवशी ८.३ कोटी, दुसऱ्या दिवशी ११.१२ कोटी, तिसऱ्या दिवशी १६.४० कोटी, चौथ्या दिवशी १०.७ कोटी आणि पाचव्या दिवशी ११.१४ कोटींची कमाई केली होती. आतापर्यंत या चित्रपटाची एकूण कमाई ही ८० कोटींपेक्षा अधिक झाली आहे. त्यामुळे आता येत्या  हा चित्रपट १०० कोटींचा टप्पा पार करेल असा सर्वांना विश्वास वाटत आहे.

## कोर्टाने फटकारले...

सिनेमाचे निर्माते म्हणतात की- हा सिनेमा सत्य घटनांवर आधारित आहे आणि त्यामुळे तो अनेक वादांनी घेरला आहे. अनेकांनी कोर्टात धाव घेतली व या चित्रपटावर बंदी घालण्याची मागणी केली. संपूर्ण देशात चित्रपट दाखवताहेत, मग पश्चिम बंगालमध्येच बंदी का? असा सवाल  सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड आणि न्यायाधीश पीएस नरसिंहा यांनी ममता बॅनर्जी यांना विचारला. सुदिप्तो सेन दिग्दर्शित 'द केरला स्टोरी' या चित्रपटावरून मोठा वाद निर्माण झाला आहे. धर्मांतरण, ब्रेन वॉश आणि लव्ह जिहादवर या चित्रपटात भाष्य करण्यात आल्याने चित्रपट वादाच्या भोवऱ्यात अडकला आहे. त्यामुळे या चित्रपटाला राजकीय क्षेत्रातूनही मोठा विरोध होत आहे. पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी सरकारने या चित्रपटावर बंदी आणली. याप्रकरणी चित्रपट निर्मात्यांनी सर्वोच्च न्यायालयाचे दार ठोठावली. यावरून सर्वोच्च न्यायालयाने पश्चिम बंगाल सरकारलाच सुनावले. गुप्तचर यंत्रणांच्या माहितीनुसार, या चित्रपटामुळे संबंधित भागात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, असा युक्तीवाद अभिषेक मनु सिंघवी यांनी केला. वरिष्ठ वकिल हरिश साळवे चित्रपट निर्मात्यांच्या बाजूने युक्तीवाद करत आहेत.



## विहिंपच्या कार्यकर्त्याला मारहाण

द केरला स्टोरी या  चित्रपटाचं कौतुक करणारी आणि तरुणींनी चित्रपट पाहाण्याचं आवाहन केलं म्हणून एका व्यक्तीला मारहाण करण्यात आल्याचा प्रकार समोर आला. दी केरला स्टोरी चित्रपटाची सध्या देशभर चर्चा चालू आहे. चित्रपटात करण्यात आलेल्या दाव्यांवरून काही ठिकाणी वादही झाल्याचं समोर आलं आहे. ३२ हजार महिलांचं धर्मांतरण केल्याचा दावा चित्रपटात करण्यात आला आहे. यावरून दावे-प्रतिदावे केले जात असताना दुसरीकडे राजस्थानमध्ये चित्रपटाचं समर्थन करणाऱ्या एका व्यक्तीवर तीन अज्ञातांनी हल्ला केल्याचा प्रकार समोर आला आहे. ही व्यक्ती विश्व हिंदू परिषदेची सदस्य असल्याची माहिती पीटीआयच्या वृत्तात देण्यात आली आहे

विश्व हिन्दू परिषद
धर्मो रक्षति रक्षितः





## बंदीची मागणी




द केरळ स्टोरीच्या ट्रेलरमध्ये अदा शर्माचे धर्मांतर, लग्न आणि पाकिस्तानात तस्करी झाल्याचेही दाखवण्यात आले आहे. याशिवाय, यात मुस्लिम महिलांवरील अन्याय आणि अत्याचारही दाखवण्यात आले आहेत. चित्रपटाचा टीझर रिलीज झाल्यापासून 'द केरळ स्टोरी'वर बंदी घालण्याची मागणी होत आहे. तमिळनाडूतील एका पत्रकाराने चित्रपटावर बंदी घालण्यासाठी केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळ, केरळचे मुख्यमंत्री कार्यालय आणि माहिती आणि प्रसारण मंत्रालयाकडे याचिका केली. या चित्रपटाच्या माध्यमातून केरळची प्रतिमा मलीन करून तेथे धार्मिक भेदभाव पसरवण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे अनेकांचे म्हणणे आहे. देशाच्या राजकारणात सध्या 'द केरळ स्टोरी'चा मुद्दा प्रामुख्याने चर्चेत आला आहे. एकीकडे पश्चिम बंगालच्या ममता बॅनर्जी सरकारने चित्रपटाला अजंडा म्हणत बंदी घातली आहे, तर दुसरीकडे काही राज्यांनीही चित्रपट करमुक्त करण्यासाठी कंबर कसली आहे. अशा स्थितीत आता काही राज्यांमध्येही चित्रपट करमुक्त करण्याची मागणी जोर धरू लागली आहे, तर काही राज्यांमध्ये त्यावर बंदी घालण्याचीही मागणी होत आहे. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी या चित्रपटाला उत्तर प्रदेशमध्ये करमुक्त जाहीर केले असून याआधी मध्य प्रदेशातही चित्रपट करमुक्त करण्यात आला. दरम्यान, चित्रपट करमुक्त करण्याचा अर्थ काय आहे आणि यामुळे चित्रपटाच्या तिकिटांवर किती परिणाम होतो, हेही पहाणे महत्वाचे असते.

## शबाना आझमींनी दिला पाठिंबा



विविध वादांमुळे चर्चेत आलेल्या द केरळा स्टोरी सिनेमावर बंदी घालण्याची मागणी होत आहे. आता बॉलिवूडमधील ज्येष्ठ अभिनेत्री शबाना आझमी यांनी या सिनेमाला पाठिंबा देत टीका करणाऱ्यांना सडेतोड उत्तर दिलं आहे. सोमवारी शबाना यांनी या संदर्भात ट्विट करत सिनेमावर टीका करणाऱ्यांना खडे बोल सुनावले आहेत. त्यांच्या मते लालसिंह चड्ढा सिनेमावर जशी बंदीची मागणी अयोग्य होती तशीच या सिनेमाबाबत केली जाणारी मागणी अयोग्य आहे.जे लोक द केरळा स्टोरी सिनेमावर बंदी घालण्याची भाषा करत आहेत तेचलोक आमिर खानच्या लाल सिंग चड्ढा सिनेमावरही बंदी घालू इच्छित होते. या दोन्ही गोष्टी चुकीच्या आहेत.कारण सेंट्रल बोर्ड ऑफ फिल्म सर्टिफिकेशनने एकदा सिनेमा पास केल्यानंतर कोणालाही अतिरिक्त घटनात्मक अधिकार बनण्याचा अधिकार नाही...' अशा शब्दांत शबाना यांनी टीकाकारांचे कान उपटले आहेत.विशेष म्हणजे शबाना आझमी ह्या पुरोगामी विचाराच्या आहेत.पुरोगामी विचारवंत या चित्रपटाला विरोध करत असताना आझमी यांनी पाठिंबा देणे म्हणजे त्यांनाही ही चपराक म्हणावी लागेल.





**मनोरंजन कर हटवला जातो :** जर भारतातील कोणत्याही राज्यात चित्रपट करमुक्त केला तर याचा अर्थ त्या राज्याने चित्रपटाच्या तिकिटावरील मनोरंजन (एंटरटेनमेंट) कर माफ केला आहे. विविध राज्ये वेगवेगळ्या दराने मनोरंजन कर आकारतात. तर चित्रपट करमुक्त करायचा की नाही हा त्या-त्या राज्याचा स्वतंत्र निर्णय असतो. मनोरंजन कर उपकर किंवा सेवा कराप्रमाणे असतो. एखादा चित्रपट करमुक्त झाल्यानंतर हाच कर सरकारकडून माफ केला जातो.

## नशीब देखील उजळले...



गेल्या शुक्रवारी दी केरला स्टोरी चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर त्यावरून मोठी चर्चा सुरू झाली आहे. केरळमध्ये या चित्रपटाच्या विषयामुळे आणि त्यातील दाव्यांमुळे वाद निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तसेच, त्याचे पडसात देशात इतर ठिकाणीही उमटताना पाहायला मिळत आहेत. सुदीप्तो सेन दिग्दर्शित 'द केरळ स्टोरी' या चित्रपटाचा ग्राफ सलग सहाव्या दिवशी देखील सुसाट आहे. या चित्रपटाच्या खात्यात ६८.८६ कोटी रुपये जमा झाले असून, हा चित्रपट थांबण्याचे नाव घेत नाही आहे. शिवाय या चित्रपटामुळे अदा शर्मा हिचे नशीब देखील उजळले आहे. तिच्या अभिनय करकीर्दीसाठी हा सिनेमा मैलाचा दगड ठरला आहे. अभिनेत्री अदा शर्मा हीची मुख्य भूमिका असलेल्या या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर कमाल केली आहे. ढहश घशीरश्र डींी या चित्रपटाने पहिल्या दिवसापासूनच उत्तम कलेक्शन सुरू केले, जे ६ दिवसानंतरही सुरूच आहे. या चित्रपटाने सहाव्या दिवशी १२ कोटींची कमाई केली आहे.यावर्षी प्रदर्शित झालेल्या अनेक चित्रपटांना १२ कोटींची ओपनिंग करता आली नाही, पण अदा शर्माच्या 'द केरळ स्टोरी'ने सहाव्या दिवशी १२ कोटींचा व्यवसाय करून दाखविला. या चित्रपटाने त्याच्या ६ दिवसांच्या कलेक्शनसह एकूण ६८.८६ कोटी रुपये त्याच्या खात्यात जमा केले आहेत. रविवारी १६.५० कोटींची कमाई करून सिनेमा 'द काश्मीर फाइल्स'ची पुनरावृत्ती करत आहे का असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

## ब्रेन वॉशची कहाणी



द केरळ स्टोरी या चित्रपटाचा ट्रेलर रिलीज झाल्यानंतर असे बोलले जात आहे की, हा चित्रपट 'द काश्मीर फाइल्स (२०२१)' च्या धर्तीवर बनवण्यात आला आहे आणि यामुळे तो मोठा हिट ठरू शकतो. काश्मीर फाइल्समध्ये काश्मिरी पंडितावर झालेल्या अत्याचारांची, तसेच त्यांच्या हत्येची कथा मांडण्यात आली होती. द केरळ स्टोरी च्या ट्रेलरमध्ये केरळमधील मुलींचे ब्रेनवॉश करून त्यांचे धर्मांतर केल्यानंतर त्यांना आयएसआयएस या दहशतवादी संघटनेत कसे सामील केले गेले हे दाखवण्यात आले आहे. या ट्रेलरची सुरुवात शालिनी उन्नीकृष्णन (अदा शर्मा) या केरळमधील हिंदू मुलीच्या परिचयाने होते. जी तिच्या आयुष्यात खूप आनंदी आहे. पण, त्यादरम्यान असे काही घडून जाते की शालिनीला इसिस कैद करतात. इस्लामच्या नावाखाली असे काही तरुण आहेत जे हिंदू मुलीनं आपल्या प्रेमात अडकवतात, आणि त्यांच्याशी संबंध ठेवण्यास प्रवृत्त करतात, त्यानंतर त्यांना इसिसच्या हवाली करतात.

## चित्रपट करमुक्त का करतात?

चित्रपटाच्या विषयावर किंवा थीमवर अवलंबून अधिकाधिक लोकांनी चित्रपट पाहावा यासाठी त्यावरील करात सूट दिली जाते. चित्रपट करमुक्त असण्याचा कोणताही निश्चित नियम नाही. तर एखाद्या चित्रपटावर अवलंबून राज्य सरकारे त्यांचे कर उत्पन्न वगळण्याचा निर्णय घेतात.

संकलन व संपादन : पुरुषोत्तम कुलकर्णी